संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 2 | Issue : 9 | Marathi Monthly | Thane, 1 March 2025 to 31 March 2025 | Pages 16 | Price : 10/-

# तरीही, गंगा 'मैली' आणि 'अर्धमेली' होतेच आहे.....

## गंगा-यमुना संगमी हजारो कोटींच्या 'कुंभमेळ्या'चं (खरंतरं, 'दंभमेळ्या'चं) आयोजन करणारे, हे कसले 'हिंदुत्ववादी'...हे फक्त, कसलेले 'सत्तावादी व भांडवलवादी'!



**कुंभमेळ्याचं आयोजन...हे केवळ, कुंभस्थळी अव्यवस्थेमुळे चेंगराचेंगरीत मरणाऱ्या शेकडो भाविकांच्या सरणावरच नव्हे; तर, जाज्वल्य साधुसंतांच्या बलिदानाच्या पापांच्या राशीवर कसं घडतं गेलंय...ते तपासून पहाणं, भारतीय-अध्यात्माचा सच्चा पाईक असलेल्या, प्रत्येक खऱ्याखुऱ्या 'धार्मिक' (दांभिक नव्हे) हिंदुचं 'धर्मकर्तव्य'च होय!**

गंगामातेच्या शुद्धीकरणासाठी व तिचं अस्तित्व टिकवण्यासाठी स्वामी आत्मबोधानंद, स्वामी गोपालदास, आयआयटीतील प्राध्यापक प्रो. जी. डी. अग्रवाल ऊर्फ स्वामी ज्ञानस्वरुप सानंद, बाबा नागनाथ योगेश्वर आदि पूजनीय संतमंडळींनी आजवर 'महाबलिदान' केलयं; तरीही, ''गंगा मैली'' होतेच आहे.... ही संतमंडळी नेमकी कोण होती? खचितच ती, यमुनातिरीचा जैववैविध्यपूर्ण निसर्ग उध्वस्त करणाऱ्या श्री श्री रविशंकरांसारखी वा सर्वोच्च न्यायालयापुढे आपलं नाक रगडावं लागलेल्या 'पातंजली-उद्योगपती' रामदेव स्वामींसारखी, व्यवस्थेच्या पालखीचे भोई असणारी 'सरकारी-संतमंडळी' नव्हती (त्यामुळेच, या महाबलिदानाकडे 'गोदी-मिडीया'च्या प्रसिद्धीचा झोत, कसा काय वळेल?)!

....ती होती, भारतीय आध्यात्मिक-परंपरेशी नातं सांगणारी खरीखुरी जातिवंत संतमंडळी. जशी, आपण हल्ली सर्वत्र पसरलेली पहातो (विशेषतः, महाराष्ट्रात), तशी ती 'वारसाहक्का'ने आपल्याच घराण्यात धर्मसंप्रदायाची 'परंपरा' चालवणारी ''आध्यात्मिक-उद्योगपती'' मंडळी नव्हतीच!

अयोध्येपासून हाकेच्या अंतरावर गंगातिरी, संतशिरोमणी असलेले हे पुण्यात्मे... गंगामातेसाठी प्राणार्पण करत असताना; आज 'कुंभ' नावाच्या 'दंभमेळ्या'चं आयोजन करणारी, हीच तथाकथित हिंदुत्ववादी मंडळी, सरळ बेपर्वाईने हात बांधून बसली होती. साधुसंतांचे बलिदान व्यर्थ जाऊ देताना व वरुन त्यावर नक्राश्रू ढाळताना, आम्ही या ढोंगी लोकांना उघड्या डोळ्यांनी पाह्यलं.

...तेव्हा, 'नॉन बायॉलॉजिकल गंगापुत्र', गंगा वाचवणं तर राहीलं बाजुलाच, उलट त्यांच्या 'गांधीवादी' आमरण उपोषणाकडे साफ दुर्लक्ष करुन त्यांना मरणाच्या दारात नेऊन सोडत होते... आणि, अंति घडतही तसंच गेलं! ...वानगीदाखल सांगायचं तर, गंगेचं शुद्धीकरण तसेच, ...पृष्ठ क्र. ४ वर

### *दलाल स्ट्रीटवर रक्तपात! जे घडत आहे ते गंभीर सिद्ध होऊ शकते...*

काल काच दिवसात सेन्सेक्स १४०० पेक्षा जास्त अंकांनी घसरला. म्हणजे गेले पाच महिने घसरतच होता. तो अजून जोरदार आपटला.

ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी असे पाच महिने सलग सेन्सेक्स घसरत आहे. सतत पाच महिने घसरण याआधी २९ वर्षांपूर्वी झाली होती. यावरून परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येईल.

सप्टेंबर मध्ये ८५, ९७८ असा ऐतिहासिक उंचीवर असलेला सेन्सेक्स १४ टक्क्यांनी घसरून ७३,१९२ वर बंद झाला. लक्षात घ्या सेन्सेक्स सर्वात मोठ्या ३० कंपन्यांच्या शेयर्सवर बेतलेला असतो.


अंतरंग



शिक्षणक्षेत्रात कंत्राटीकरण आल्यानंतरच, 'सरां'चं चुलीतलं 'सरपण' झालं!
पृष्ठ क्र. ८



*डोनाल्ड ट्रम्प जाहीर करत असलेल्या आर्थिक धोरणांकडे एक व्यक्ती म्हणून न बघता अमेरिका देश म्हणून बघितले कि बरेच अर्थ लागतील*
*- संजीव चांदोरकर*
पृष्ठ क्र. ११



*''अर्वाच्यतेची लाट: सोशल मीडियावरील बिघडलेली प्रवृत्ती''*
*- समीर गायकवाड*
पृष्ठ क्र. १२

# ज्ञानेश कुमार यांची, भारताच्या मुख्य निवडणूक आयुक्तपदी झालेली नियुक्ती, हे घटनाविरोधी कृत्य!

## ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांचा ठाण्यात जोरदार घणाघात







**ठाणे (प्रतिनिधी) : ‘‘रात्रीस खेळ चाले’’ यापद्धतीने, मध्यरात्री घाईघाईत मोदी-शहा सरकारकडून, ज्ञानेश कुमारांची मुख्य निवडणूक आयुक्तपदी झालेली नियुक्ती हे घटनाविरोधी कृत्य असून, यामुळे भारतीय लोकशाहीचा ‘आगीतून फुफाट्यात’ असा दुर्दैवी प्रवास सुरु झालाय. आधी राजीव कुमार आणि आता, ज्ञानेश कुमार हे नि:पक्षपाती निवडणूक आयुक्त म्हणून, केवळ दर्जाने ‘सुमार’ नसून, त्यांच्याकडून झालेली व होऊ घातलेली फसवणूक ‘बेसुमार’ असल्याचा जोरदार घणाघात ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांनी ठाण्यात केला. भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून, ज्ञानेश कुमार यांच्या झालेल्या नेमणुकीचा निषेध करण्यासाठी ‘धर्मराज्य पक्षा’च्या वतीने, २१ फेब्रुवारी-२०२५ रोजी, ठाणे स्टेशन परिसरात जोरदार निदर्शने करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. मोदी-शहा यांच्या केंद्र सरकारकृत नवीन कायद्यानुसार, निवडणूक आयुक्त नेमताना आता त्रिसदस्यीय समितीत, मुख्य न्यायाधीशांना डावलून पंतप्रधानांच्या मर्जीतल्या केंद्रिय मंत्र्याची वर्णी लावलीय. मोदी सरकारने या घटनाबाह्य कायद्यानुसार (ज्याबाबत, सर्वोच्च न्यायालयात सुनावणी प्रलंबित आहे) आपल्या अधिकारात घाईघाईत सोमवार, दि. १७ फेब्रुवारी-२०२५ रोजी, मध्यरात्री मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीची अधिसूचना काढली, हे संविधानाच्या विरोधात असून, देशाचा मुख्य निवडणूक आयुक्त हा नि:पक्ष असावा, असे मत राजन राजे यांनी यावेळी स्पष्ट केले.**

दरम्यान, आपल्या जोरदार भाषणात उपस्थितांना संबोधित करताना ते पुढे म्हणाले की, अशातऱ्हेने निवडणूक आयोग हा, निवडणुकीतील फसवणुकीचा नवनवा ‘प्रयोग’ बनत चालल्याने व संपूर्ण न्यायदान-प्रक्रिया सत्ताधाऱ्यांच्या अनुचित दबावाखाली आल्याने, भारतीय जनतेच्या अस्वस्थतेला आणि संतापाला, रस्त्यावर उतरुन वाट मोकळी करुन देण्यावाचून दुसरा मार्गच शिल्लक राहिलेला नाही. मुळात, आपल्या देशात जिथे निवडणुकीतील मतदान, हीच प्राधान्याने एकमेव ‘लोकशाही-प्रक्रिया’ असते व जिथे महत्त्वाच्या राष्ट्रीय मुद्द्यांवर ‘सार्वमत’ घेतलं जाण्याची परंपरा बिलकुल नसते; अथवा, ‘राईट टू रिजेक्ट’ आणि ‘राईट टू रिकॉल’सारखे लोकेच्छेला पुरेपूर वाव देणारे कायदे नसतात; तसेच, जिथे कालबाह्य ‘‘फर्स्ट पास्ट द पोस्ट’’ ही निवडणूक-प्रक्रिया राबविली जाते, तिथला निवडणूक-आयोग तर, अगदी टी. एन. शेषन यांच्यासारखा पराकोटीचा ‘रामशास्त्री बाण्या’चा हवाच. मात्र, इथे राजीव कुमार गेले आणि ज्ञानेश कुमार आले. म्हणजेच, ‘सापनाथ गेला आणि नागनाथ आला’ असे झाले असून, भारतीय लोकशाहीला विषारी डंख मारणाऱ्या, ‘भाजप-संघीय’ प्रवृत्तीचा जोरदार निषेध राजन राजे यांनी यावेळी केला.

**२०२३चा सर्वोच्च न्यायालयाचा पारदर्शी-निकाल, पाशवी बहुमतावर बदलून, केंद्रीय निवडणूक आयोग हा, केंद्र सरकारचा ‘बटीक’ बनवण्याच्या व त्याद्वारे फसवणुकीच्या मार्गाने निवडणुका जिंकण्याच्या ‘भाजप-संघीय’ कारस्थानावर एकाच शरसंधान साधत, निवडणूक-आयोगच सरकारच्या पंखाखाली आल्यास, लोकशाहीची घोर विटंबना होते, निवडणूक एक फार्स बनते आणि देशात हुकुमशाहीचा नंगानाच सुरु होतो, भारतात तर तो केव्हाचाच सुरु झाल्याचे टीकास्त्र, राजन राजे यांनी मोदी-शहा सरकारवर सोडले.**

या निषेध आंदोलनाला ‘धर्मराज्य पक्षा’चे सहसचिव नरेंद्र पंडित, पक्षाचे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर, सचिन शेट्टी, ठाणे लोकसभा सचिव विनोद मोरे, पक्षाचे प्रवक्ते समीर चव्हाण, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे ठाणे शहरप्रमुख प्रदीप शिंदे, काँग्रेस ठाणे जिल्हाध्यक्ष विक्रांत चव्हाण, सचिव राहुल पिंगळे, राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे ठाणे जिल्हाध्यक्ष सुहास देसाई, रिपब्लिकन सेनेचे ठाणे जिल्हाध्यक्ष बाबासाहेव येडेकर, ‘धर्मराज्य पक्षा’चे युवा कार्यकर्ते निलेश सावंत, अमित लिबे, सुमित कदम यांच्यासह, ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चे कामगार सभासद मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

### ‘‘रात्रीस खेळ चाले’’

अशापद्धतीने घाईघाईने मोदी-शहा सरकारकडून जी ज्ञानेश कुमारांची CEC प्रमुखपदी नुकतीच ‘घटनाविरोधी’ नेमणूक झालीय...त्यामुळे, भारतीय लोकशाहीचा ‘‘आगीतून फुफाट्यात’’ असा दुर्दैवी प्रवास सुरु झालाय...दोन्ही ‘कुमार’ (राजीव कुमार आणि ज्ञानेश कुमार), हे नि:पक्षपाती उएउ म्हणून दर्जाने, केवळ ‘सुमार’ नसून, त्यांच्याकडून झालेली व होऊ घातलेली फसवणूक ‘बेसुमार’ आहे!

अशातऱ्हेनं, निवडणूक ‘आयोग’, हा निवडणुकीतील फसवणुकीचा नवनवा ‘प्रयोग’ बनत चालल्याने व संपूर्ण न्यायदान-प्रक्रिया सत्ताधाऱ्यांच्या अनुचित दबावाखाली आल्यानं...भारतीय जनतेच्या अस्वस्थतेला आणि संतापाला रस्त्यावर उतरुन वाट मोकळी करुन देण्यावाचून दुसरा मार्ग शिल्लक राहीलेला नाही.

...‘ज्ञानेश कुमार’ यांच्या निवडणूक-आयोगाच्या प्रमुखपदी झालेल्या, ‘घटनाविरोधी’ नेमणुकीचा जळजळीत निषेध करण्यासाठी, ‘धर्मराज्य पक्ष’ व ‘इंडिया-आघाडी’तील प्रमुख घटक पक्षांतर्फे २१ फेब्रुवारी-२०२५ (शुक्रवार) रोजी ठाणे-रेल्वेस्थानकाच्या सॅटिस-उड्डाणपुलाखाली सायं. ५ ते ८ च्या दरम्यान निदर्शने करण्यात आली.... ...पृष्ठ क्र. ३ वर

# .....मुख्य निवडणूक आयुक्तपदी झालेली नियुक्ती, हे घटनाविरोधी कृत्य! ...पृष्ठ क्र. २ वरुन

## राजीव कुमार गेले आणि ज्ञानेश कुमार आले...

म्हणजेच, ''सापनाथ गेला आणि नागनाथ आला!''

भारतीय-लोकशाहीला विषारी डंख मारणाऱ्या भाजप-संघीय प्रवृत्तीचा धिःक्कार असो, धिःक्कार असो...!!!

मुळात आपल्यासारख्या देशात जिथे निवडणुकीतील मतदान...हीच प्राधान्याने एकमेव 'लोकशाही-प्रक्रिया' असते व जिथे महत्त्वाच्या राष्ट्रीय-मुद्द्यांवर सार्वमत (Referundum) घेतलं जाण्याची परंपरा बिलकूल नसते अथवा 'राईट टू रिजेक्ट', 'राईट टू रिकॉल'सारखे लोकेच्छेला पुरेपूर वाव देणारे कायदे नसतात; तसेच, जिथे 'Proportional Representation' ऐवजी, कालबाह्य "First Past the Post (FPTP)' निवडणूक-प्रक्रिया राबवली जाते... तिथला 'निवडणूक-आयोग' तर, अगदी टी. एन. शेषन यांच्याप्रमाणेच पराकोटीचा 'रामशास्त्री बाण्या'चा निःपक्ष हवाच!

**''टायगर (राहुल गांधी) अभी जिंदा है...मगर, चुनाव-आयोग...???''**

**''ज्ञानेश कुमार चले जाव, चले जाव!**

२०२३ चा सर्वोच्च न्यायालयाचा पारदर्शी-निकाल पाशवी बहुमतावर बदलून, CEC हा केंद्र सरकारचा 'बटीक' बनवण्याच्या व त्याद्वारे, फसवणुकीच्या मार्गाने निवडणुका

### ''ज्ञानेश कुमार चले जाव...चले जाव!''

निवडणुकीदरम्यान होणाऱ्या फसवाफसवीचे, कायदाभंगाचे व मतचोरीचे स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवणाऱ्या भाजपाचे 'पंचांग' (पाच अंगे) अथवा पंचसूत्री.....

१) निवडणूकपूर्व फसवणूक (Pre-Poll Fraud) : विरोधी मतदारांची मतदार-यादीतून बेकायदेशीर छाटणी...

२) निवडणूकपश्चात फसवणूक (Post-Poll Fraud) : मतदानवेळ संपल्यानंतर भाजपाच्या 'कमळ' वा NDAच्या चिन्हावर बेकायदा होणारी मतनोंदणी...

३) मतनोंदणीदरम्यान फसवणूक (During Voting) : 'ईव्हीएम'मध्ये तांत्रिक-हेराफेरी (EVM Tampering Fraud) करुन सत्ताधाऱ्यांना फायदा...

४) निवडणूक-प्रचारादरम्यान फसवणूक (Fraud During Electioneering) : नोटबंदी, इलेक्टोरल-बॉण्ड्स, PM Care Fund वगैरे आर्थिक-घोटाळ्यांद्वारे गोळा केलेल्या प्रचंड भांडवली काळ्या पैशाचा निवडणूक-प्रचारासाठी व मतदारांना प्रलोभन दाखवण्यासाठी बेकायदा वापर...

५) निवडणूक-प्रचारादरम्यान फसवणूक (Fraud During Electioneering) : लोकप्रतिनिधी-कायदा (The Representation of the People Act (RPA) of 1950-51) सरळ सरळ धाब्यावर बसवून 'जातधर्मविद्वेष' पसरवत मतांचं ध्रुवीकरण...

जिंकण्याच्या 'भाजप-संघीय' कारस्थानाचा तीव्र निषेध...!!!

निवडणूक-आयोगच सरकारच्या पंखाखाली आल्यास 'लोकशाही'ची घोर विटंबना होते, निवडणूक निव्वळ एक फार्स बनते व देशात हुकूमशाहीचा नंगानाच सुरु होतो...तो तर, भारतात केव्हाचाच सुरु झालाय!

"GO BACK DNYANESH KUMAR... GO BACK!"

**''ये ख़ामोश मिज़ाजी तुम्हे जीने नहीं देगी,**
**इस दौर में जीना है तो कोहराम मचा दो....''**

CEC/EC नेमणुकीबाबतच्या वर्ष-२०२३मधील अनूप बरनवाल जनहित-याचिकेवरील सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शन-तत्त्वांचं पालन करा आणि 'दोनास-एक' असं एकतर्फी सरकारी बहुमत नष्ट करा!

**"GO BACK DNYANESH KUMAR...GO BACK!"**

FISH STARTS STINKING FROM² THE HE-D...So Also, DEMOCRACY Starts ROTTING From It's HEAD i.e. CEC/EC...!!!

SAY NO TO ELECTORAL FRAUDS....

**''ज्ञानेश कुमार चले जाव, चले जाव!**

# निवडणुकीदरम्यान होणाऱ्या फसवाफसवीचे, कायदाभंगाचे व मतचोरीचे स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवणाऱ्या भाजपाचे 'पंचांग' (पाच अंगे) अथवा पंचसूत्री.....

१) निवडणूकपूर्व फसवणूक (Pre-Poll Fraud) : विरोधी मतदारांची मतदार-यादीतून बेकायदेशीर छाटणी...

२) निवडणूकपश्चात फसवणूक (Post-Poll Fraud) : मतदानवेळ संपल्यानंतर भाजपाच्या 'कमळ' वा NDAच्या चिन्हावर बेकायदा होणारी मतनोंदणी...

३) मतनोंदणीदरम्यान फसवणूक (During Voting) : 'ईव्हीएम'मध्ये तांत्रिक-हेराफेरी (EVM Tampering Fraud) करुन सत्ताधाऱ्यांना फायदा...

४) निवडणूक-प्रचारादरम्यान फसवणूक (Fraud During Electioneering) : नोटबंदी, इलेक्टोरल-बॉण्ड्स, PM Care Fund वगैरे आर्थिक-घोटाळ्यांद्वारे गोळा केलेल्या प्रचंड भांडवली काळ्या पैशाचा निवडणूक-प्रचारासाठी व मतदारांना प्रलोभन दाखवण्यासाठी बेकायदा वापर...



५) निवडणूक-प्रचारादरम्यान फसवणूक (Fraud During Electioneering) : लोकप्रतिनिधी-कायदा (The Representation of the People Act (RPA) of 1950-51) सरळ सरळ धाब्यावर बसवून 'जातधर्मविद्वेष' पसरवत मतांचं ध्रुवीकरण...

डाव्या विचारसरणीचं आव्हान असेपर्यंत 'भांडवलशाही', पुतना-मावशीसारखी आपलं सत्यस्वरुप लपवत, 'लोकशाही' व 'व्यक्तिस्वातंत्र्या'सारख्या उच्चकोटीच्या जीवनमुल्यांचं आश्वासक अवगुंठन घेऊन येते; पण, ते आव्हान मोडीत निघताच (जगात सोव्हिएत युनियनचं पतन किंवा देशात कामगार-चळवळ मृतप्राय होणं) आपलं नृशंस-शोषक स्वरुप प्रकट करते! जगातल्या कुठल्या एखाद्या धर्मग्रंथात, कामाच्या ठिकाणी लोकेच्छेला मान नसावा आणि लोकशाही, राजकीय-प्रांगणातच व ती देखील फक्त, निवडणुकीतील मतदानाच्याच माध्यमातून असावी...असं काही लिहीलं गेलंय का? मग, 'कंपनी-दहशतवादा'ची, सार्वत्रिक गळचेपी-मुस्कटदाबी कशासाठी? 'कॉर्पोरेटीझम' (Corporatism) ते 'कॉर्पोरेट-टेररिझम' (Corporate-Terrorism) हा भांडवलशाहीचा अधोगतीचा प्रवास कशासाठी सहन करायचा?

*...राजन राजे (भाई)*

# ''आजचा शिक्षित-अशिक्षित समाज, जी काही उरलीसुरली संस्कृती शिल्लक आहे, ती सोडून झपाट्याने अधिकाधिक विकृतीकडे वळतोय''!

**'नमामि गंगे' या २०१४पासूनच्या गंगानदीच्या शुद्धीकरण-प्रकल्पाच्या २२ हजार कोटी रुपयांचं गौडबंगाल काय? गंगा-यमुना जर आजही एवढी 'मैली' असेल; तर, कुठे गेले ते खर्च केलेले पैसे?? ...असे प्रश्न विचारण्याची हिंमत व सकस मानसिकता दाखवण्याऐवजी अंधश्रद्धेचा केवळ 'बाजार' नव्हे; तर, फार मोठा 'आजार' पसरवणाऱ्या... आणि त्याहीपेक्षा कैकपटीने घातक असा धोका म्हणजे, त्याची परिणती म्हणून हिंसक, विकृत, भ्रष्ट सत्ताधाऱ्यांना-राजकारण्यांना व माणुसकीचा लवलेश नसलेल्या भांडवलदारांना भक्कम पाठींबा देऊ पहाणाऱ्या...या अशा कुंभमेळ्यांचं करायचं तरी काय?**



चेंगराचेंगरीत मरणाऱ्या हजारो जीवांची यःकिंचितही क्षिती न बाळगता (त्याच्या बातम्या तर लपवल्या गेल्याच; पण, सगळे व्हिडिओसुद्धा पद्धतशीरपणे नष्ट केले गेले) जर समाजाची करोडो करोडो पावलं 'अमृतस्नान' नव्हे, तर संगमातलं 'अशुद्धस्नान' करण्याकडे बिनदिक्कत वळत असतील...तर, याचा अर्थ सरळ आहे की, ''आजचा शिक्षित-अशिक्षित समाज, जी काही उरलीसुरली संस्कृती शिल्लक आहे, ती सोडून झपाट्याने अधिकाधिक विकृतीकडे वळतोय''! जेवढी जेवढी 'आर्थिक-विषमता' अधिकाधिक थैमान घालती होईल, सार्वजनिक-जीवनात उजळ माथ्याने सत्याची जागा 'असत्य' घेत जाईल, मूळ भारतीय-अध्यात्माने (आजच्या बनावट, ढोंगी भाजप-संघीय हिंदुत्ववाद्यांनी नव्हे) वर्णिलेल्या राजनीतिचा पूर्ण संकोच होऊन 'न्याय' मिळणं दिवसेंदिवस दुरापास्त होत जाईल...तेवढं तेवढं साधं जगणं देखील मुश्किल होत जाईल आणि जगण्याच्या आधाराचे सगळेच दोर नियतीवर सोपवलेला दिङ्मूढ समाज, विविध धर्मसंप्रदायांच्या गर्दीत चेंगराचेंगरी करताना दिसेल...कधि कुंभमेळा, कधि लालबागचा राजा...तर कधि उत्तरेतल्या चारधाम-कावड-वैष्णोदेवी यात्रेपासून दक्षिणेतल्या शबरीमला-तिरुपती बालाजीपर्यंत ठिकठिकाणच्या लांबच लांब पसलेल्या रांगेत उभा राहिलेला दिसेल!

महत्त्वाची बाब म्हणजे, अगोदरच अंगाला विशिष्ट लेप लावून अस्वच्छ गंगा-यमुनेच्या संगमात डुबकी घेणारे बडे राजकारणी, बडे भांडवलदार...नंतर सप्ततारांकित सोयीसुविधा असलेल्या ठिकाणी कमीतकमी वेळात पोहोचून आपलं 'मलिन' अंग, झटपट निर्जंतुक करुन घेतात...हे सामान्य जनतेला आकळत नाही आणि तिला हे ही कळत नाही की, ही फक्त 'संगमातली डुबकी' मारण्यापुरतेच ते तुमच्या 'पातळी'वर असतात... नंतर, ते पाण्याबाहेर येऊन तुमच्यापासून फटकून दूर रहात, जमिनीवर-हवेवर 'मालकीहक्क' प्रस्थापित करत सुखनैव संचार करत रहातात; मात्र, 'भांडवली-व्यवस्थे'त जगण्यातला 'न्याय-सन्मान-समता'नाकारलेगेलेलेशापितसामान्य जीव...तसेच गुदमरलेल्या अवस्थेत कुंभमेळ्यानंतर मरेपर्यंत आपलं आयुष्य जगत रहातात...त्यांना संगमातही मोकळा श्वास नाही आणि संगमानंतरच्या जगण्यातही मोकळा श्वास नाही...!!!

**...राजन राजे** *(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

## अवघा १ टक्का श्रीमंतांकडे आहे देशांतील निम्मी संपत्ती!

**नवी दिल्ली :** संपत्तीची विषमता जगात कशी वेगाने वाढत आहे, हे दाखवून देणारी आकडेवारी सातत्याने पुढे येत आहे. जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांचा विचार केला असता मूठभर म्हणजे केवळ एक टक्का श्रीमंतांकडेच देशातील जवळपास निम्मी संपत्ती असल्याचे दिसत आहे. ब्राझीलमध्ये एक टक्का श्रीमंतांकडे देशातील ४९.३ टक्के संपत्ती एकवटलेली आहे. भारतातही हे प्रमाण तब्बल ४०.६ टक्का इतके आहे. अमेरिका, जर्मनी आणि चीन या देशांमध्ये एक टक्का श्रीमंतांकडे देशांची ३० टक्क्यांपेक्षा अधिक श्रीमंती एकवटलेली आहे.


| देश | एक टक्का श्रीमंतांकडे संपत्तीचा वाटा |
|---|---|
| ब्राझील | ४९.३% |
| भारत | ४०.६% |
| अमेरिका | ३५.१% |
| जर्मनी | ३१.७% |
| चीन | ३०.५% |
| फ्रान्स | २२.३% |
| इंग्लंड | २१.१% |
| जपान | १८.७% |

### श्रीमंतांवर कर किती, गरिबांकडून किती वसुली?

१ एकूण जीएसटीपैकी अंदाजे ६४% कराची भरपाई तळागाळातील ५०% लोकसंख्येकडून तर १० टक्के श्रीमंतांकडून ४% कर गोळा केला जातो.

२ श्रीमंतांच्या एकूण संपत्तीवर केवळ २% कर लावल्यास, कुपोषित लोकसंख्येच्या पोषणासाठी पुढील तीन वर्षे पुरेशी मदत मिळू शकते.

● लोकमत इन्फोग्राफिक्स (स्रोत : इन्व्हेस्ट डॉट बिलियनेअर)




## तरीही,गंगा 'मैली' आणि 'अर्धमेली' होतेच आहे..... ...पृष्ठ क्र. १ वरुन

छोट्यामोठ्या धरणं-बंधाऱ्यांमुळे गंगेचा कुंठीत झालेला, आक्रसून गेलेला मुळचा धो धो वहाणारा नैसर्गिक-प्रवाह, पुन्हा खळाळता करत गंगामातेला अनैसर्गिक मानवी-बंधनातून मुक्त करु पहाणाऱ्या...स्वामी ज्ञानस्वरुप सानंद यांनी तब्बल १२२ दिवसांच्या आमरण-उपोषणाअंति ११ ऑक्टोबर-२०१८ रोजी प्राणत्याग केला! अत्यंत संतापजनक बाब ही की, गंगामातेच्या आरोग्यासाठी-पुनरुज्जीवनासाठी बलिदान देणाऱ्या स्वामी ज्ञानस्वरुप सानंदसारख्या 'पुण्यात्म्या'ला...हे तथाकथित नीच हिंदुत्ववादी लोक, अमेरिकेच्या CIA चा दलाल (एजंट) म्हणून यथेच्छ बदनाम करते झाले होते (जेव्हा, हे स्वतःच तसे 'एजंट' असल्याचं अलिकडेच अमेरिकेच्या डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने USAID प्रकरणी उघड केलंय)

...तेव्हा, हे कसले 'हिंदुत्ववादी'? ते फक्त, पाशवी 'सत्तावादी आणि भांडवलवादी' आहेत, बस्स! पैशातून सत्ता आणि सत्तेतून पुन्हा पैसा...शिवाय, हाती EVM चं आणि झीश-Poll d Post-Poll व्यवस्थापनाचं हुकमी तंत्र आहेच, सोबतीला...धन्यवाद!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# जैन मुनी आचार्य विद्यासागर यांच्या स्मृत्यर्थ खास १०० रुपयाचे नाणे भारत सरकारतर्फे जारी करण्यात आलंय, त्यानिमित्ताने....

**आचार्य विद्यासागर यांच्यासह शांतिसागर, तरुणसागर, क्षमासागर वगैरे जैन मुनिंविषयी जरुर आदर आहे, आदर असावा...काहीही हरकत नाही.**

**पण, यांनी संख्येने अल्पसंख्य असलेल्या; मात्र, धनसंपदेनं अतिउन्मत्त झालेल्या आपल्या जमातीविरुद्ध कधि आवाज उठवलेला दिसला आपल्याला? कबुतरांना दाणे खिलवणारी; पण, गोरगरीबांच्या पुढ्यातलं ताट हिसकावून घेणारी...ही जी, या शोषक-जमातीची घृणास्पद धन-लालसा आहे, तिचा उघड निषेध केलाय कधि यांनी??**

...तोंडाने एकीकडे 'अपरिग्रहा'चा मंत्र जपायचा (म्हणजे, धनसंपत्ती-पैसा साठवणुकीचा वरकरणी तीव्र निषेध करायचा) आणि दुसरीकडे संघटित रहात, ग्राहक-श्रमिकांचं अमानुष शोषण करुन अफाट-अचाट पैसा कमावायचा, हेच यांचं हृदयशून्य, क्रूर व्यावहारिक धोरण राहीलेलं आहे...ज्याला, We don't do 'business in charity' and 'charity in business' असं कॉर्पोरेटीय-शर्करेचं गोंडस-गोड आवरण देणार, ही बेशरम लोकं! यासंदर्भात या अशा जैन, गुजराथी, मारवाड्यांच्या संत-मुनि-आचार्यांनी त्यांना खडे बोल सुनावून सुधारण्याचा प्रयत्न केल्याचं ऐकिवात आहे कधि?

**...ओशो (जे स्वतः जैन होते), जैनांच्या शोषण-मनोवृत्तीतील नृशंसतेबद्दल बोलताना म्हणाले होते की, ''वर्धमान महावीरांसह जैनांचे सगळेच्या सगळे चोवीस तीर्थंकर व त्यांचे अनुयायी, हे मूलतः क्षत्रियच होते...जैन धर्म स्विकारल्यानंतर अचानक टोकाचे 'शाकाहारी' झाल्यावर त्यांच्यातील 'हिंस्त्रता', 'आहारा'तून नाहिशी झाली खरी (अ‍ॅडॉल्फ हिटलरसारखे अनेक क्रूरकर्मादेखील शाकाहारीच होते); पण ती त्यांच्या 'आर्थिक-व्यवहारा'तून प्रकटली...अशारितीने, स्वभावातील मूळ 'हिंस्त्रता' कायम तर राहिलीच, उलट काळाच्या ओघात ती अंमळ वाढलीच!''**

देशाच्या, विशेषतः महाराष्ट्राच्या, 'निसर्ग-पर्यावरणा'वर आणि मराठी-मनावर...धनदांडग्या जैन-गुजू-मारवाड्यांनी, भ्रष्ट मराठी राजकारण्यांना हाताशी धरुन, आजवर अनन्वित अन्याय-अत्याचार केलेले आहेत. त्यांची बेलगाम-बेफाम अतिश्रीमंत जीवनशैली व त्यांनी उभारलेली काँक्रिटची जंगलं, उभारलेले उद्योग-व्यवसाय...यातून होणारं अपरिमित कार्बन-रासायनिक उत्सर्जन, झालेली वृक्षतोड, तुटलेली जंगलं...याविरोधात या तथाकथित अहिंसेचे पुजारी असलेल्या जैन संत-मुनींनी मोहिम राबवल्याचा कुठे दाखला आहे? हे मुनी जरुर आपल्या गरजा कमीतकमी राखून दिगंबरावस्थेत व्रतस्थ आयुष्य जगले असतील; पण, त्याची करोडो पटीने विपरीत-भरपाई करत अतिऐश्वर्यसंपन्न आयुष्य, हा धनदांडगा जैन-गुजराथी समाज जगत आलाय आणि या त्यांच्या संतमुनींनी त्यांना त्या पापकर्मात कधि रोखल्याचं वा धिक्कारल्याचं दिसलेलं नाही, हे कसं विसरुन चालेल?




**...मुंबईचं सोडाच, ठाण्यापुरतं बोलायचं झालं; तरी ठाण्यात जागोजागी तुम्हाला जैन मुनी-आचार्यांची नावं आणि जैन मंदिरं चौकाचौकात, नाक्यानाक्यावर झळकताना दिसतील. गेल्या चाळीस-पन्नास वर्षांपासून पद्धतशीरपणे ठाणे शहरातील मराठी घरं आणि दुकानं रिकामी करुन, हे शहर धनदांडग्या जैन-गुजराथी-मारवाड्यांना आंदण देणं आणि मूळ मायमराठ्यांना शहराच्या परिघाबाहेर विविध नगरांमधून कोंबड्या-बकर्यांसारखं १०' X १०' मध्ये कोंडून घालणं सुरुच आहे (फक्त, तथाकथित 'पट्टशिष्य' असलेल्या मंत्रीमहोदय एकनाथ शिंदेंच्या कारकिर्दीत, ते सगळं टिपेला पोहोचलंय, एवढंच)! ठाण्यातले मनगटशहा असलेले स्थानिक-राजकारणी, या धनदांडग्यांच्या पैशातून मोफत वह्यापुस्तकं-खेळसाहित्य वाटप करत आणि असंख्य सार्वजनिक मंडळांद्वारे गणेशोत्सव-पूजा-दहीहंड्या-गरबे-नवरात्रोत्सव-भंडारे यांचं आयोजन करत रातोरात ठाण्यात मोठे झाले... निवडणुका हमखास जिंकू लागले. पण बदल्यात, मराठी तरुण हळूहळू कंपन्या-कारखान्यांमधून 'कंत्राटी-गुलाम' बनत गेले व आज स्वतःच आणि आपल्या पुढील पिढ्यापिढ्यांचं आयुष्य बरबाद करते झालेत.**

खरंतर, भारतीय संत-परंपरेतली शंभर नंबरी खणखणीत नाणी जर कुठली असतील; तर ती आहेत संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, नामदेव, बसवेश्वर महाराज, चक्रधरस्वामी, नरसिंह मेहता, तुकडोजी महाराज, समर्थ रामदास, संत सावता माळी, गोरा कुंभार आदि अनेक संत शिरोमणी असे आहेत की, ज्यांच्या नावावर शंभराचीच काय हजाराची नाणी किंवा नोटा छापल्या गेल्या पाहिजेत... पण, जैन मुनींच्या बाबतीत जशी तत्परतेनं भाजपाई-संघीय सरकारची कृती होते, तशी ती होणे नाही...लक्षात घ्या की, भाजप-संघीय दुष्ट व कारस्थानी राजकारणात हा भारत देश, झपाट्याने गुजराथी-भाषिकांची खाजगी मालमत्ता बनत चालल्याचं, हे अभद्र लक्षण आहे!

...विशेष बाब म्हणजे, भारतीय संस्कृती-एकात्मता प्रसारणाच्या कामी महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याबद्दल आचार्य विद्यासागर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ, हे शंभर रुपयाचं नाणं व एक पाच रुपयाचा खास लिफाफा टपाल खात्यातर्फे प्रसारित केला गेल्याचं कुणाकडून सांगण्यात येतंय...तर, ज्यांनी या देशातली जगभरात उत्तुंग असलेली अशी सहिष्णू भारतीय आध्यात्मिक-परंपरा आणि देशाची एकात्मता, याला आपली राजकीय-दुकानदारी धो धो सुरु रहावी म्हणून 'सुरुंग' लावलाय, त्यांच्याकडूनच!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

---

साम्यवादी-क्रांतिच्या भविष्याविषयी भारतापुरतं बोलायचं झाल्यास...भारतात, विशेषतः उत्तर भारतात, ती जवळपास अशक्यप्राय तोपर्यंत आहे; जोपर्यंत, 'जगण्याचा जुगार' जन्मतःच हरत आलेले तळागाळातील उत्तर भारतीय लोक, जातधर्मीय-जोखडात पुरते अडकलेले रहातील! जिथे जिथे, श्रमिकांच्या सन्मानाने सुखरुप जगण्यासाठी अशी क्रांति होणं, प्राधान्याने अत्यावश्यक असतं...तिथेच, कुठलातरी 'धर्म खतरे में' असल्याची आवई, प्रसंगोपात्त उठत रहात असते किंवा किमान तिथे, फाजिल-उत्सवप्रियतेला तरी ऊत आणला जात रहातो...जेणेकरुन, समाजातल्या वंचितांचं आपल्या पोटाच्या प्रश्नाकडे लक्ष जाऊच नये आणि चुकूनमाकून जरी ते गेलं तरी, आपल्या कमनशिबामुळे वा आपल्यातच काही मोठी उणीव असल्यामुळेच आपली अशी दारुण अवस्था झाल्याची समजूत आपसूकच पटत रहावी.

***...राजन राजे (भाई)***

''पुर्णातून पूर्ण वजा जाता पूर्ण शिल्लक रहाणं, ही हिंदुधर्मातील संकल्पना काय किंवा शुन्यातून शून्य वजा जाता शून्य शिल्लक रहाणं; ही बौद्ध धर्मातील संकल्पना काय...दोन्हीचा निर्देश, धर्मापेक्षा 'धार्मिकता' आणि देवापेक्षा 'देवत्व' मोठं मानण्याकडेच आहे! मग, एखाद्या सानेगुरुजींनी सांगितल्यासारखा ''जगाला प्रेम अर्पावे'', हाच आपसूक धर्म बनत जातो... सानेगुरुजींची आत्महत्या आणि नित्शेनं प्रतिपादिलेलं 'देव मरुन गेला' किंवा श्रीराम लागू म्हणाले तसं, ''परमेश्वराला रिटायर (निवृत्त) करा'', हे सारं एकाच अर्थाच्या विविध कृष्णधवल छटा बनून जातात! ज्याक्षणी, सानेगुरुजी आत्महत्या करतात...त्याचक्षणी, या पृथ्वीवर 'देव' अथवा 'परमेश्वर' नामक संकल्पनेच्या उंटाच्या पाठीवर शेवटची काडी ठेवली जाते आणि उंट कायमचा खाली बसतो!

***...राजन राजे (भाई)***

# शिवप्रेम आणि औरंगजेबी मानसिकता!

समता, स्वातंत्र्य, बंधूता या मूल्यांवर उभारलेले एक सार्वभौम प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून तुम्ही अस्तित्वात येता त्या क्षणी तुमच्या आधुनिक इतिहासाचे नवे पर्व सुरू होते.

या घटितानंतर या राष्ट्राचे लोक म्हणून तुम्ही काय कामगिरी केली आहे, त्यावरूनच तुमची चिकित्सा होणार असते.

असे लोकशाही राष्ट्र म्हणून तुम्ही अस्तित्वात येण्याआधीचा इतिहास महत्त्वाचा आहेच आणि त्याचे वस्तुनिष्ठ अनुशीलनही आवश्यकच.




पण, त्या इतिहासात ज्या वेळी तुम्ही शोषण आणि अन्यायाचे बळी ठरलात. फक्त त्याच विवक्षित भागाचे लोढणे गळ्यात बांधून घेऊन आणि त्या ऐतिहासिक अपमानाचा, अन्यायाचा बदला आज आता तुमच्यासोबत तुमच्या लोकशाही राष्ट्राचे नागरिक असलेल्या; त्या प्रजासत्ताकाचे भाग असलेल्या भिन्नधर्मीय देशबांधवांकडून तुम्ही घेऊ पाहता, शतकांपूर्वीच्या ऐतिहासिक घटनांसाठी आज निराळ्याच लोकांना जबाबदार ठरवत त्यांचा द्वेष करता, त्याचे उट्टे काढण्यासाठी पेटून उठणे हेच कर्तव्य मानता त्या वेळी प्रयत्नपूर्वक निर्मिलेल्या सार्वभौम प्रजासत्ताक राष्ट्राची आणि पर्यायाने त्याचे लोक म्हणून आपली सर्वांची हारच होते.

मध्ययुगीन इतिहासाच्या अर्धवट आकलनातून त्या ऐतिहासिक घटनांसाठी वर्तमान काळातील लोकांना जबाबदार ठरवून त्यांच्याकडून बदला वसूल करण्याची ओढ असणे या एका मोठ्याच सामाजिक रोगाने भारताला ग्रासले आहे.

मानापमानाच्या विचित्र कल्पना करून घेत. इतिहासात आपण बळी ठरलो, दुर्बळ ठरलो हा गंड आणि Victim मानसिकता त्यामागे आहे. एकीची बेकी झाली की सारेच नासते.

**एक झेन म्हण आहे की 'रक्ताने रक्त धुऊन निघत नाही'. द्वेष आणि हिंसा आपल्याला आधुनिक जगात कुठेही प्रगतिपथावर घेऊन जाणार नाहीत आणि तसे मागास राहणे ही एक लोकशाही राष्ट्र आणि त्याचे लोक म्हणून आपली हार ठरेल.**

क्रूर सत्ता-सामर्थ्य हेच सर्वोपरी आणि त्या जोरावर दुर्बळांना आपण वागवू तसे त्यांनी वागावे ही खास 'औरंगजेबी' मानसिकता. या 'औरंगजेबी' मानसिकतेप्रमाणे वागण्याची इच्छा बाळगणे शिवछत्रपतींना आदर्श मानणाऱ्या कुणासही भूषणास्पद नाही.

Force is all conquering, but its victories are short lived.

शिवछत्रपतींच्या राज्यात ज्या मूल्यांनी लोकांना एकत्र आणले ती अन्यायाविरुद्धची चीड होती, एकमेकांविषयी प्रेम, बंधुभाव, सहभावना ही होती. या मूल्यांचा विसर हा अनुयायांनी केलेला महापुरुषाचा पराभव ठरेल.

ते श्रेयस नाही !

*...हरुन शेख*

# शिशमहालचा निगेटिव्ह प्रचार

**केजरीवालच्या ५० कोटी खर्चाच्या शिशमहालचा निगेटिव्ह प्रचार करुन, भाजपाने दिल्ली इलेक्शन खिशात घातली... मात्र, त्याचवेळी 'पीएम'च्या बंगल्यात सुरक्षा-सुधारणा करण्यासाठी, ४५७ कोटी खर्च केले जाणारेत, याबद्दल कुठेही चर्चा नाही. वरील दोन्ही खर्च, सरकारी तिजोरीतून होणारेत/झालेत... म्हणून, जनतेत चर्चा होणे साहजिक ठरते!**

पण, जी संस्था नोंदणीकृत नाही, कालपर्यंत जिची आर्थिक स्थिती पुराणातील सुदाम्यासारखी होती, जिचा आर्थिक स्रोत; म्हणजे, वर्षातून एकदाच गुरुपौर्णिमेनिमित्त भगव्या ध्वजाजवळ, स्वयंसेवक जी रक्कम ठेवत, तेवढाच असे. अशी संस्था २०१४नंतर, अचानक मालामाल होते आणि देशातील प्रमुख ठिकाणी, मोक्याच्या जागी टोलेजंग बांधकामे काढते... याचं आश्चर्य वाटते.



होय, दिल्लीत 'आरएसएस'ने ३०० कोटी किमतीची, १२-१२ मजली अशी, ३ कार्यालये बांधलीत... अगदी सर्व सुविधांसह. शिवाय, अनेक शहरांतील संघ कार्यालयेदेखील नव्याने बांधलीत. याच्या जोडीला प्रत्येक जिल्ह्यात 'भाजपा'ने टोलेजंग ऑफिसेस बांधलीत. अशी ४०० ऑफिसेस बांधून झालीत. उरलेली लवकर पूर्ण होतील.

यासाठी पैसा कुठून आला? असा POGO टाईप प्रश्न विचारुन, स्वतःचं हसं करुन घेऊ नका... त्याऐवजी स्वतःला प्रश्न विचारा की, संघ कधी शेतकरी, गोरगरीब, कष्टकरी किंवा असंघटित समाजाच्या प्रश्नावर एकदा तरी आवाज उठवताना दिसलाय?

त्याऐवजी संघ नेहमीच भांडवलदारांचा 'फूटसोल्जर' राहिलाय, पक्षपाती पाठीराखा राहिलाय. सध्या तर सत्ताच त्यांच्या हातात... मग लक्ष्मी तर, संघ कार्यालयात मांडी घालून बसणारच ना!

काँग्रेसला १४० वर्षांत जे जमलं नाही, ते 'संघ-भाजपा'ने अवघ्या १० वर्षांत करुन दाखवलंय. हा दोघांच्या मनोवृत्तीतील फरक आहे...

काँग्रेस जेव्हा देशासाठी लढत होती, तेव्हा संघ जातीसाठी लढत होता. आजही त्यात बदल झालेला नाही. कधी-कधी सोने म्हणून आपण पितळाला फसतो !!!

*(समाजमाध्यमातून साभार.....)*

## सत्तेची अनिती

*नैतिकता
रसातळाला गेली,
बुद्धीचा खुन झाला
एवढा कर्मठपणा
एका सत्तेच्या
नशेने केला
व्यवहार
सगळीकडेच चालतो
जो उघड होतो
तो 'व्याभिचार' ठरतो
एवढा सरळ अर्थ
राजकारणात कळतो
दिले काही, घेतले काही
बोलायचं कुठंच नाही
जमेल तेवढं कमवायचं
विरोधकांना नमवायचं
एवढा गुन्हा करून
राजकारण कसं गमवायचं*

**– कांतीलाल कडू**

# हातच्या कंकणाला आरसा कशाला...

**‘जपान–द. कोरिया’ सारख्या प्रगत व जगभर औद्योगिक–साम्राज्य उभं करणाऱ्या देशांमध्येदेखील, तुलनेनं अब्जोपतींची (Blood Billionaires) संख्या मोठी नाही वा तिथे फारसे कुणी ‘दरिद्री नारायण’ही नाहीत! मात्र, ज्यांनी ‘दरिद्री नारायण’ ही चपखल संज्ञा वापरली त्या, म. गांधींच्या किंवा ज्यांनी, समतेचा संदेश दिला त्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भारतासारख्या देशात मात्र, एका बाजुला ‘कंत्राटी–कामगार/कर्मचारी’ पध्दतीतले कारखान्यात राबणारे व रोजगार हमी योजनेअंतर्गत शेताच्या बांधावर राबणारे शेतमजूर नांवाचे ‘दरिद्री नारायण’ प्रचंड प्रमाणात तयार होत रहातात; तर, दुसऱ्या बाजुला ‘कर लो दुनिया मुठ्ठी में’वाल्या धनदांडग्या जैन–गुजू–मारवाड्यांच्या फौजाच्या फौजा बिनदिक्कत उभ्या रहात जातात व दिवसागणिक वाढत जातात.**

साखर कारखान्यातून एका बाजुला गोड साखर आणि दुसऱ्या बाजुला दर्पयुक्त दुर्गंधी मळी बाहेर पडावी, अशी ही दोन परस्परविरोधी ‘समाजध्रुव’ निर्माण करणारी टोकाची विषम अर्थव्यवस्था आपल्या देशात मौजूद आहे. गेल्या २० वर्षाहून अधिक काळ जपानमध्ये आर्थिक–मंदी असूनही, भारताच्या तुलनेनं फारच कमी ‘आर्थिक–विषमता’ असल्याचं चित्र आहे. जपान–द. कोरियामध्ये बहुतांश ‘मध्यमवर्ग’च आहे. याचं प्रमुख कारण, तिथे वारसाहक्काबाबत (**Inheritance Tax**) व भेटवस्तूवरील कराबाबत (**Gift Tax**) एकूणच कर–संरचना फारच कडक; म्हणजे, वस्तू वा मालमत्तेच्या चढ्या किंमतीनुसार १० ते ५५% एवढे हे कर, चढत्या भाजणीने मोठे आहेत. **साधारणत चौथ्या पिढीनंतर आपल्या पूर्वजांनी कमावलेल्या संपत्तीवरील वारसाहक्क, त्यामुळे जवळपास संपुष्टातच येतो. म्हणूनच तर, जपानमध्ये साधं घरगुती काम करणाऱ्या ‘कामवाल्या बाई’ला सुध्दा ऑफिसमध्ये काम करणाऱ्या सुशिक्षित महिलांच्या आसपासचा पगार आणि सवलती दिल्या जाऊ शकतात. मध्यंतरी, दक्षिण कोरियात अतिश्रीमंतांची संपत्ती वारसाहक्कानं पुढल्या पिढीकडे हस्तांतरित होताना, जवळपास निम्मा वाटा सरकारजमा होत असल्याने, ‘सॅमसंग’ या जगविख्यात कंपनीच्या ‘ली कून–ही’ या ७४ वर्षीय कॅन्सर आजारग्रस्त मालकापश्चात ‘ली’ कुटुंबियांवर ‘वारसाहक्क–कर’ भरण्यासाठी ‘सॅमसंग’चे शेअर्स विकण्याची वेळ आली होती. ही जशी, ‘ली’ कुटुंबियांची सॅमसंग कंपनीवरील मालकी धोक्यात**




**येण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. हे आपल्याकडे कधि घडेल काय?** की, ‘‘अंबानी, अदानी, टाटा, बिर्ला, मल्ल्या, जिंदाल यासारख्या उद्योगपतींच्या घरात पाळणा हलला रे हलला की, जन्माला आलेलं बालक, कुठलंही स्वकर्तृत्त्व ‘न’ गाजवताच व एकही पैसा वारसा–कररूपाने ‘न’ भरताच, अब्जोपती बनतं आणि तिचं परंपरा पुढे चालू रहाते ‘‘राजकीय आणि सामाजिक लोकशाही’’चं मंदिर, हे फक्त, ‘आर्थिक लोकशाही’च्या वा ‘आर्थिक समरसते’च्या पायावरच उभं राहू शकतं. अन्यथा नव्हे!

आमच्या राज्यघटनेत ‘व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुता, समाजवाद’ यासारख्या शब्दांची भरमार असणं, केव्हाही चांगलचं आहे; पण, त्यात ‘‘सर्वच भारतीय एकत्रितपणे, देशाच्या आर्थिक प्रगती व समृध्दीतील, ‘देशाचे नागरिक’ म्हणून हक्काचे वाटेकरी आहेत’’ (**Common OR Shared Prosperity**), हा अत्यंत महत्त्वपूर्ण शब्दच कुठे नाही. मग, तसा ‘अर्थविचार व अर्थव्यवहार’ कुठून असणार???.

मध्यंतरी लोकसभा–निवडणुकीच्या प्रचारादरम्यान काँग्रेसचे अत्यंत लोकप्रिय नेते राहुल गांधी म्हणाले होते की, ‘‘संपत्तीचं सर्वेक्षण करावं लागेल’’ ..तेव्हा, त्याचा ध्वनित अर्थ हाच असावा किंवा असायला हवा; मग भले, नरेंद्र मोदींसारखे भांडवलदारांचे ‘हस्तक’, त्याविरोधात कितीही बोंबलू देत वा आगपाखड करु देत!

**...राहुल गांधींसमोर जपान–कोरिया किवा नॉर्डिक (नॉर्वे, स्वीडन, फिनलंड, डेन्मार्क इ.) देशांप्रमाणेच या अब्जाधीशांच्या मारुतीच्या शेपटाप्रमाणे वाढत जाणारी संख्या रोखण्याचं मोठं आव्हान आहे व तशी अपेक्षा आहे...कारण, आजवर अगदी अरुण शौरींसारखे विचारवंत राजकारणी काँग्रेसवर अशी रास्त टीका करत आलेले आहेत की, ‘‘काँग्रेस म्हणजे भाजप वजा गाय किंवा भाजप म्हणजे काँग्रेस अधिक गाय!’’ हे काँग्रेसचं ‘भांडवलीस्वरुप’, राहुल गांधींच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेसचं सरकार सत्तेवर आल्यावर... अशातऱ्हेच्या कर–संरचनेतून संपत्तीच्या ‘न्याय्य–फेरवाटपा’ने बदलून ‘लोकाभिमुख’ व्हायला हवं... धन्यवाद!**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# हे सिनेमाचं परीक्षण नाहीये...

ऐतिहासिक सिनेमाचे प्रेक्षक दोन प्रकारचे असतात, इतिहास माहित असलेले आणि नसलेले. सिनेमाचा उद्देश जसा आहे, तसा इतिहास मांडण्याचा असेल तर, अडचण नाही... मात्र, धार्मिक अजेंडा घेऊन सिनेमा येत असेल तर, नाट्यमयतेच्या आणि सिनेमॅटिक लिबर्टीच्या नावाखाली, सोयीचा इतिहास समोर आणला जातो.

ज्या बहुसंख्य प्रेक्षकांना इतिहास माहिती नसतो, त्यांना सिनेमा हाच इतिहास वाटतो. सामान्य माणूस सतत आपल्या दुरवस्थेला, पतनाला कुणालातरी जबाबदार ठरवून शत्रू शोधत असतो. इतिहासाची शत्रूलक्षी, धार्मिक आधारावर ढोबळ मांडणी, या प्रेक्षकाला सोपी आणि पटणारी असते.

स्वराज्याच्या इतिहासातल्या गैरसोयीच्या बाजू आहेत तशा आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा सगळ्यात मोठा लष्करी आणि सामरिक पराभव करणारा मिर्झाराजे जयसिंग हिंदू होता आणि त्याच्या हमीवर महाराज आग्र्याला गेले आणि त्याच्याच मुलाच्या, रामसिंगच्या हमीवर तिथे राहिले.

औरंगजेब दक्षिणेत आला तेव्हाही आणि त्या आधीही मुघलांच्या सैन्यात मराठा, राजपूत आणि भारतातल्या वेगवेगळ्या भागातले हिंदू सरदार मोठ्यासंख्येने होते. शहाजीराजे अटकेत होते, तेव्हा त्यांना अटक करण्यात पुढे असणारा बाजी घोरपडे हाही मराठा. सोयीचा इतिहास मांडण्याच्या नादात, कुणी सरसकट ब्राह्मण झोडपत तर, कुणी मुस्लीम झोडपत.

इतिहास सोयीचा नसतो, तो जसा आहे तसा असतो आणि तसाच स्विकारण्यात शहाणपणा आहे... अमृतकाळात संपूर्ण समाजाने, शहाणपणाशीच नेमकी फारकत घेतल्याने, हेही ‘अरण्यरुदन’ आहे एवढंच!

*...आनंद शितोळे*

*एका कवीने एकदा*
*चित्रकार मित्राला सांगितले*
*सुखाचे चित्र काढायला*
*चित्रकाराने काढले*
*शांतपणे झोपलेले एक कुटुंब*
*पलंगाच्या तुटलेल्या एका पायाला*
*विटांनी आधार दिला*
*घराच्या जीर्ण छतावरून पाऊस झिरपत होता*
*छत्री तेवढी*
*पावसापासून थोडेफार वाचवत होती*
*सोबत कुत्रादेखील त्यांचा*
*पलंगावर शांतपणे झोपला होता*
*आनंदाची व्याख्या करणारा म्हणून*
*चित्रकार जगविख्यात झाला होता*
*परिस्थिती कशीही असो*
*आनंदाला पडत नाही फरक*
*फारच झाले तर*
*एकमेकांना म्हणायचे*
*थोडे इकडे सरक, तिकडे सरक*
*पांघरूणाची करायची थोडी ओढाताण*
*आनंदाने घालवायचा असा*
*सारा ताण...*


*- श्रीपाद भालचंद्र जोशी*

# शिक्षणक्षेत्रात कंत्राटीकरण आल्यानंतरच, 'सरां'चं चुलीतलं 'सरपण' झालं!

## धर्मराज्य पक्षाध्यक्ष राजन राजे यांचा, प्रस्थापित भांडवली व्यवस्थेवर जोरदार घणाघात...

**कल्याण : ''शिक्षण आणि आरोग्य, या सार्वजनिकक्षेत्रातल्या बाबी आहेत... मात्र, आपल्या या देशात अशी कुठली परिस्थिती उद्भवलीय की, सार्वजनिक शाळांमध्ये लोक जायला तयार नाहीत. सरकार आणि भांडवली-व्यवस्था, सार्वजनिक शिक्षणसंस्था उभारायला तयार नाहीत, एवढी शिक्षणक्षेत्रातली नितीमत्ता खालावलीय. एक नवा 'चातुर्वर्ण्य' उभा राहिलाय की, ज्यात माझ्या मराठी श्रमिकांची मुलं, संसाधनसंपन्न अशा श्रीमंत शाळांमध्ये जाऊ शकत नाहीत; कारण, लाखो रुपयांच्या फी आहेत या शाळांच्या. दुर्दैवाने, संपूर्ण शिक्षणक्षेत्राला एकप्रकारची वाळवी लागलेली आहे. त्यातलीच एक कीड म्हणजे, कंत्राटीपद्धत. शिक्षणक्षेत्रात कंत्राटीपद्धत आल्यानंतर आणि शिक्षक कंत्राटावर नेमले जाऊ लागल्यानंतर, 'सरां'चं चुलीत घालणारं 'सरपण' कधी झालं, ते आम्हाला कळलंदेखील नाही.**

सध्याची शिक्षणाची जी काही शोचनीय अवस्था झालीय ती यामुळेच...दळवी सर व दळवीबाई या दाम्पत्याने आणि तुम्ही साऱ्या शिक्षकवृंदाने निम्न आर्थिकस्तरातील पालकांचा स्नेहभावाने हात हातात धरुन... ज्या प्रकारची जातिवंत 'मराठी-संस्कृती' इथे रुजवलीय-वाढवलीय, ती पाहून मी मनापासून धन्य झालो. संपूर्ण शिक्षण-क्षेत्राला वेड्यावाकड्या पद्धतीने नफा कमावण्याची 'भांडवली-वाळवी' लागली असताना... 'दळवी-दाम्पत्य' सेवेभावे करत असलेलं काम मोठं आहे!'' असा जोरदार घणाघात 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी केला. कल्याणमधील प्रतिष्ठित शिक्षणसंस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, एस.डी.एल.के. एज्युकेशन ट्रस्ट संचालित, द्वारका विद्यामंदिर आणि बालविकास मंदिर या विद्यालयांच्या १५व्या वार्षिक स्नेहसंमेलन आणि बक्षीस वितरण समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी पुढे बोलताना राजन राजे म्हणाले की, भांडवलदार आणि धनदांडग्यांच्या गेल्या दोन-तीन पिढ्यांनी, या महाराष्ट्राचं आतोनात नुकसान केलेलं आहे. त्यांच्यामुळेच ८० ते ९० टक्के असलेल्या मराठी श्रमिकवर्गाला अत्यंत तुटपुंजे वेतन दिलं जातंय... आणि म्हणूनच, आम्ही कामगारक्षेत्रात काम करत असताना आणि पुढे राजकारणात कंत्राटीपद्धतीविरुद्ध आवाज उठवताना, या रक्तपिपासू शोषक-व्यवस्थेला ठामपणे नव-अस्पृश्यता व नवी गुलामगिरी संबोधतो, ज्याच्याविरोधात एकही राजकीय पक्ष बोलू शकत नाही; कारण, दुर्दैवाने कुठेतरी भांडवली व्यवस्थेशी त्यांचे हात बांधलेले असतात. माझ्या मराठी भगिनीला, तिचा नवरा कंत्राटी कामगार असल्याने, त्याचा दहा-बारा हजारांचा पगार पुरत नाही. त्याच्यावर ही वेळ येऊ नये म्हणून, आम्ही कामगारक्षेत्रात एक घोषणा दिलीय, ''किमान वेतन ४० हजार रुपये प्रतिमास... न देणाऱ्यास तुरुंगवास'' ...आणि मित्रांनो, तुम्हाला अभिमानाने सांगतोय, यातून एक चळवळ उभी राहिलीय. भविष्यात आम्ही कुठल्या पद्धतीचा देश, या मुलांच्या हाती सोपवणार आहोत? हीच आमच्या समोरची मोठी चिंता आहे. महाराष्ट्रातील माझी मराठी मुलं, उच्चशिक्षित होवोत न होवोत... प्रत्येक मुलगा डॉक्टर-इंजिनियर झालाच पाहिजे, याची आवश्यकता नाही; पण झालाच तर आनंदच आहे. मात्र, झालात न झालात आणि साधे कामगार जरी झालात, तरी तुम्हाला सन्मानाने जगता आलं पाहिजे. **या देशातली आर्थिक-विषमता रोखली गेली पाहिजे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समतेचा-संदेश व्यवहारात उतरला पाहिजे, यासाठीच आम्ही काम करीत आहोत. मराठी माणसाच्या हातातून महाराष्ट्राची माती निसटू नये यासाठी, आम्हाला डोळ्यात तेल घालून काम करणं गरजेचं आहे आणि ते आम्ही नेटानं करतो आहोत, असा दुर्दम्य आशावाद राजन राजे यांनी यावेळी बोलून दाखवला.**



दरम्यान, एस.डी.एल.के. एज्युकेशन ट्रस्ट संचालित, द्वारका विद्यामंदिर आणि बालविकास मंदिर या विद्यालयांचे संस्थापक/अध्यक्ष डी.बी. दळवी आणि मुख्याध्यापिका मीरा दळवी या दाम्पत्याचे 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी, तोंडभरुन कौतुक केले. तुम्ही उभयता, समर्पित भावनेनं काम करीत आहात, ज्यामुळे आमचा उर निश्चितपणे अभिमानाने भरुन आल्याचे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले. वार्षिक स्नेहसंमेलन आणि बक्षीस वितरण समारंभाच्या याप्रसंगी, 'धर्मराज्य पक्षा'चे खजिनदार अजित सावंत, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे सचिव समीर चव्हाण, माजी जीएसटी आयुक्त जे.एल. पांडे, माजी नगरसेवक महेश गायकवाड, समाजसेवक विनोद मिश्रा, नांदिवलीचे माजी सरपंच पंढरीशेठ ढोणे, बिर्ला महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक सुनील फडके, राष्ट्रीय कुस्ती पंच संघटनेचे अध्यक्ष सुभाष ढोणे, द्वारका विद्यामंदिराचे शिक्षक-पालक संघाचे अध्यक्ष संतोष खामकर, कल्याण युवा सेना अध्यक्ष प्रतिक पाटील, शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे कोकण विभागीय अध्यक्ष प्रशांत भामरे, कोळसेवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम, समाजसेवक रामदास ढोणे, कल्याण जिल्हा शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे अध्यक्ष बाळकृष्ण जगे आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, द्वारका विद्यामंदिराच्या सीमा दळवी, गौरी देवधर आणि बालविकास मंदिराचे मुख्याध्यापक प्रकाश धानके यांनी विशेष परिश्रम घेतले.







# स्वराज्याचे शत्रू!

**शिवजन्मोत्सव हा एका दिवसाचा सोहळा ठरूच शकणार नाही. तो अव्याहतपणे सुरु राहणारा आणि प्रत्येक क्षणाला वर्धितावस्थेकडे नेणारा महाजन्मोत्सव आहे. तसे पाहिले तर बुद्धी असलेल्या मानवाला विसर, विस्मृतीचा शाप आहे. त्यामुळे महाराजांचा जन्मोत्सव, सोहळ्यापुरता साजरा करणारे मावळे वळणावळणावर आहेत. पण महाराजांचे विचार याच मातीत पेरून सृजनशीलतेचे पीक घेणारे कोट्यवधी नागरिक जेव्हा राजकारणापलीकडे जावून महाराज अनुभवतील तेव्हा कपाळावर चंद्रकोर न कोरताही त्यांचे हात स्वराज्याच्या रक्षणासाठी सरसावतील याची खात्री आहे.**

'स्वराज्याचे रक्षण' हेच अंतिम सत्य आहे. **महाराजांनी याच मातीत अफजलखानाला पुरला तो केवळ 'स्वराज्याचा शत्रू' म्हणून. त्याचा कोथळा काढला तो कडवड मुस्लिम म्हणून नाही. तर 'स्वराज्याचा शत्रू' बनून चाल केल्यानेच त्याला जीवानीशी गाडला. या घटना केवळ इतिहासापुरत्या मर्यादित नाहीत.** तर चंद्र, सूर्याचे अबाधित भ्रमण जोपर्यंत आकाशात राहिल, तोपर्यंत ही घटना कुणालाच विसरणे शक्य नाही. मात्र, त्यात जाती आणि धर्मभेदाला तसूभरही वाव नव्हता. म्हणूनच महाराज डोक्यावर घेण्याऐवजी डोक्यात रुजवणे अधिक संवेदनशील ठरतील असं स्वाभाविकपणे वाटते. अफझलखानाचा वध करतानाचे काही चलचित्र लावले की, धार्मिक भावना दुखावल्या जात असल्याच्या घटना घडत असताना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केला जातो. तिकडे स्वराज्याच्या शत्रूला असे तुडविले गेल्याचा इतिहास असल्याचे नमुद करून आमच्या स्वराज्याचा ऱ्हास करण्याचा विडा उचलणाऱ्यांची इथे हिच गत केली जाते, असे आवर्जून म्हटले पाहिजे. तिथे आमचा शुद्ध हेतू स्वराज्य रक्षणाची महती गाण्याचा आहे, हे सांगायला हवे.

आदिलशाहीचा सर्वात शक्तिमान बलाढ्य पण अत्यंत कपटी सरदार अफजलखान जेव्हा महाराजांना भेटायला आला. तो कशासाठी येतोय आणि किती कपटनितीने येतोय याचा अंदाज महाराजांना होताच. १६५४ साली महाराजांचे थोरले बंधू संभाजी महाराजा यांना कर्नाटकातील कनकगिरी येथील लढाईत कपटाने अफझलखानाने मारले होते. हे छत्रपती शिवाजी महाराज कसे विसरतील? ती घटना तर माता जिजाऊंच्या काळजातील भळभळती जखम होती. तरीही माँ साहेबांनी महाराजांना न अडवता अफझलखानाच्या भेटीला जाण्यास परवानगी दिली धन्य ती माता. महाराजांनी युद्ध सामर्थ्यांनी अफझलखानाला टराटरा फाडून टाकला. तत्पूर्वी स्वराज्याशी मुजोरी करणाऱ्या आदिलशाहीचा कैवार घेवून आलेल्या चंद्रराव मोरे यांचीही शिवरायांनी गर्दन उडवली. तो हिंदूच होता. पण 'स्वराज्याचा शत्रू' होता. अफझलखानाचा निष्ठावंत सेवक असलेला कृष्णाजी प्रभाकर कुलकर्णी अंगावर येताच महाराजांनी त्याला यमसदनी पाठविले. स्वराज्याच्या आड येणाऱ्या कोणत्याही जाती, धर्माच्या कपटी शत्रूला ठार मारण्याची ही नीती होती.

स्वराज्याच्या रक्षणासाठी विविध जातीधर्माच्या मावळ्यांनी योगदान दिले आहे. अफझलखानाची इत्थंभूत माहिती देणारा आणि त्याच्या वधासाठी वाघनखे तयार करून देणारा एक पठाणच होता, रुस्तम ए जमाल असे त्याचे नाव होते. तसे पाहिले तर, महाराजांकडे सातशे पठाणांची फौज होती. परंतु, स्वराज्याविरोधात ज्यांनी ज्यांनी वाकड्या नजरेने पाहिले त्याचा खात्मा महाराजांनी केला तो दिव्यदृष्टीने आणि भविष्याचा अंदाज घेऊनच.

हेच तर आपल्याला महाराजांच्या चरित्रातून शिकायचं आहे. **आज, केवळ महिन्याला मिळणाऱ्या काही हजार रुपयांच्या भाड्यापोटी बांगलादेशीयांना आपण सहारा देत आहोत. काही कुविख्यात गुंडांना घरं भाड्याने देत आहोत. तेव्हा कधी त्यांच्यावर आपण संशय घेत नाहीत. पुढे त्यातील काही जण 'स्लीपर सेल'करिता काम करून मुंबई, बँगलोरसारख्या शहरात साखळी बॉम्बस्फोट घडवून जातात ते कळतदेखील नाहीत. हे सगळे आपल्या देशाचे म्हणण्यापेक्षा 'स्वराज्याचे मारेकरी' आहेत, याचा अंदाज जोपर्यंत आपण घेवून महाराजांची रणनीती, युद्धनीती, गनिमी कावा आणि त्यांचे धारिष्ट्य अंगात भिनवून स्वराज्याच्या रक्षणाची दृढश्रद्धा, आत्मनिष्ठा बाळगत नाही आहोत, तोपर्यंत महाराजांचे विचार आपल्या रक्तातून वाहू लागण्याची काहीच शक्यता नाही.** अशावेळी केवळ औपचारिकता करतो इतकंच ध्यानात घ्यायला हवे. त्याऐवजी स्वराज्य रक्षणासाठी एक एक विचार पेरून छत्रपतींचे राष्ट्र, स्वराज्य वाचविणे हेच जीवनाचे अंतिम ध्येय जोपर्यंत ठरवून त्या दिशेने वाटचाल करीत नाही, तोपर्यंत आपण महाराजांच्या रक्षक फौजेतील मावळे ठरू शकणार नाहीत.

आजची परिस्थिती फार बिकट आहे. परतीचे दोर कापले गेले असल्याने सगळ्यांनीच स्वराज्यावर होणाऱ्या आक्रमणाविरोधात लढण्यासाठी ठोस कार्यक्रम राबविणे हिताचे आहे. त्याकरिता हवी ती फक्त राजांची स्वराज्य रक्षण नीती!

***–कांतीलाल कडू***

---

*निसर्गाहून स्वतःला श्रेष्ठ समजण्यातून येणारे... कार्बन, रासायनिक, आण्विक 'प्रदूषणकारी' महाकाय-प्रकल्प म्हणजे, विकासाच्या गोंडस नावाखाली, रौद्रभीषण भविष्याची नांदी असलेलं, निसर्गाशी मांडलेलं 'द्यूत'च...जे भांडवली-व्यवस्थेचं अटळ-अनिवार्य असं अपत्य आहे! ''चराचर सृष्टी, ही परमात्म्याचंच प्रकट रूप आहे, आपण 'निसर्गप्रेमी' नसून निसर्गाचंच अविभाज्य अंग व त्याचाच आविष्कार आहोत''... असं मानण्यातून, जी आंतरिक शांति लाभते, तनमनाला वेढणारी स्वस्थता लाभते; तिचं खरीखुरी 'धार्मिकता' होय. कुठलाही धर्म, महत्त्वाचा नसून 'धार्मिकता' महत्त्वाची आहे; 'देव' महत्त्वाचा नसून 'देवत्व' महत्त्वाचं आहे! ज्याला हे उमगलं, त्याच्यासाठी 'निसर्ग' हा धर्म व 'पर्यावरण' ही जात बनून जाते...दुसरंतिसरं काहीही शिल्लक रहात नाही!*

. *..राजन राजे (भाई)*



**मोगलकालीन शहरं-बागांची नावं झटपट बदलणाऱ्या तथाकथित हिंदुत्ववादी सत्ताधाऱ्यांनी... 'शिवजयंती' इंग्रजी-कॅलेंडरनुसार साजरी करण्याची 'काँग्रेसी' परंपरा; आतातरी मोडीत काढून, ती 'हिंदू-कॅलेंडर'नुसार साजरी करायला नको का...???**

# डोनाल्ड ट्रम्प जागतिकीकरणाच्या तत्त्वज्ञानाच्या पुस्तकांची पाने टराटरा फाडत आहेत.



''सर्व देशांनी आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी आपले दरवाजे सताड उघडे ठेवले पाहिजेत'' असे ज्ञान पाजळत ते औषध जगातील गरीब/ विकसनशील देशांना जबरदस्तीने पाजणारे डॉक्टर/ सुटेड बुटेड अर्थतज्ञ आणि त्यांचे अर्धवट ज्ञानी मध्यमवर्गातील फूट सोल्जर्स बिळात लपून बसले आहेत.

शेकडो वर्षे खुष्कीच्या मार्गाने जगातील विविध भूभाग, कारण त्या काळात राष्ट्र राज्ये निर्माण झाली नव्हती, एकमेकांशी विविध वस्तूंचा व्यापार करतच होते.

होकायंत्र, जहाज बांधणी तंत्रज्ञान विकसित झाल्यावर मोठ्या प्रमाणावर समुद्रातून दूर दूरपर्यंत व्यापार होऊ लागला.

ही प्रक्रिया लहान मुल, झाड जसे नैसर्गिकरित्या ऑरगॅनिकली वाढते तशी घडत होती.

**८०च्या दशकापासून विकसित देशातील जागतिक कॉर्पोरेट भांडवल आणि त्यांच्या जागतिक बँक/ नाणेनिधी/जागतिक व्यापार संघटना सारख्या संस्थांची सुपारी घेतलेल्या या लोकांनी १५० गरीब विकसनशील देशांना आयात निर्यात खोली करायला लावली.**

**त्यांना नैसर्गिकरीत्या वाढणारा आंतरराष्ट्रीय व्यापार, आयडियालॉजिकल स्टीरॉईड पाजून वेगाने वाढवायचा होता.**

बेबंद आयातीमुळे अनेक देशातील स्थानिक उद्योग उध्वस्त झाले, संथ गतीने पिढी दर पिढी होणाऱ्या कौशल्य विकासावर परिणाम झाला, या राष्ट्रांचे हळूहळू होणारे औद्योगिकीकरण मुळापासून उघडले गेले, अन्नधान्याचा आंतरराष्ट्रीय व्यापार करणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या दडपणाखाली भारत, आफ्रिकेतील राष्ट्रे यांची शेती उध्वस्त केली गेली, सतत स्वस्त वस्तू कोठे मिळेल अशी मानसिकता असणाऱ्या फक्त ग्राहकांचा समाज तयार केला गेला, देशांची चलने घसरली, त्यातून महागाई वाढली.

...आयातीसाठी लागणारे परकीय चलन मिळवण्यासाठी कशीही करून निर्यात करण्याचे दडपण वाढले, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत टिकायचे म्हणून मानवी श्रमाची किंमत कवडीमोल केली गेली, कमी वेतनमानामुळे कोट्यावधी संसार दशकानू दशके वंचित अवस्थेतच राहिले, न भरून निघणारे पर्यावरणीय नुकसान केले गेले.

एवढ्या ब्रेकनेक वेगाने आंतरराष्ट्रीय व्यापार वाढवण्याची काय गरज होती?

तुम्हाला कल्पना आहे का तुम्ही किती संरचनात्मक नुकसान/स्ट्रक्चरल डॅमेज केले आहे?

त्याची किंमत गरीब विकसनशील देशातील शेकडो कोटी नागरिक आणि पुढे जन्माला येणाऱ्या पिढ्या मोजत आहेत, मोजणार आहेत.

कुठे फेडणार आहात हे पापे?

शेवटचे: हे डोनाल्ड ट्रम्प काही डावी वगैरे नाहीत. कट्टर डावे विरोधक आहेत. स्वतः भांडवलदार आहेत.

*...संजीव चांदोरकर*

# झणझणीत वास्तव

**मला एक गोष्ट कधीच समजली नाही की हे कलाकार किंवा अभिनेत्री असे काय करतात की त्यांना प्रत्येक चित्रपटासाठी ५० कोटी किंवा १०० कोटी मिळतात?**

**ज्या देशात अव्वल शास्त्रज्ञ, डॉक्टर, अभियंते, प्राध्यापक, अधिकारी इत्यादींना वर्षाला १० लाख ते २० लाख रुपये मिळतात, त्या देशात एक चित्रपट अभिनेता वर्षाला १० कोटी ते १०० कोटी रुपये कमावतो.**

शेवटी तो काय करतो?

देशाच्या विकासात त्यांचे योगदान काय? शेवटी, तो काय करतो की त्याने फक्त एका वर्षात एवढी कमाई केली की, देशातील सर्वोच्च शास्त्रज्ञ होण्यासाठी कदाचित १०० वर्षे लागतील!

आज ज्या तीन क्षेत्रांनी देशाच्या नव्या पिढीला भुरळ घातली आहे ती म्हणजे चित्रपट, क्रिकेट आणि राजकारण.

या तिन्ही क्षेत्रांतील लोकांची कमाई आणि प्रतिष्ठा सर्व मर्यादेपलीकडे आहे.

ही तिन्ही क्षेत्रे आधुनिक तरुणांचे आदर्श आहेत, तर त्यांच्या विश्वासार्हतेवर सध्या प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

त्यामुळे ते देश आणि समाजासाठी निरुपयोगी आहे.

बॉलीवूडमध्ये ड्रग्ज आणि वेश्याव्यवसाय, क्रिकेटमध्ये मॅच फिक्सिंग, गुंडगिरी आणि राजकारणात भ्रष्टाचार. या सगळ्यामागे पैसा हे मुख्य कारण आहे आणि हा पैसा आपणच त्यांच्यापर्यंत पोहोचवतो.

आपलेच पैसे जाळून आपण आपलेच नुकसान करत आहोत. ही मूर्खपणाची उंची आहे.

७०-८० वर्षांपूर्वीपर्यंत प्रसिद्ध कलाकारांना सामान्य मानधन मिळायचे.

३०-४० वर्षांपूर्वीपर्यंत क्रिकेटपटूंची कमाईही विशेष नव्हती.

६० वर्षांपूर्वीपर्यंत राजकारणात एवढी लूट होत नव्हती.

हळूहळू त्यांनी आम्हाला लुटायला सुरुवात केली आणि आम्ही आनंदाने लुटत राहिलो.

या माफियांच्या तावडीत अडकून आपण आपल्या मुलांचे आणि देशाचे भविष्य उद्धस्त करत आहोत.

**५० वर्षांपूर्वीपर्यंत इतके अश्लील आणि फालतू चित्रपट बनत नव्हते. क्रिकेटपटू आणि राजकारणी इतके अहंकारी नव्हते. आज तो आपला देव (?) झाला आहे. आता त्यांना डोक्यावरून उचलून मारण्याची गरज आहे जेणेकरून त्यांना त्यांची स्थिती कळेल.**

एकदा, व्हिएतनामचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष हो-ची-मिन्ह भारतात आले असताना, भारतीय मंत्र्यांच्या भेटीत त्यांनी विचारले - ''तुम्ही काय करता?''

हे लोक म्हणाले - ''आम्ही राजकारण करतो.''

हे उत्तर त्याला समजू शकले नाही, म्हणून त्याने पुन्हा विचारले - ''म्हणजे, तुझा व्यवसाय काय आहे?''

हे लोक म्हणाले - ''राजकारण हा आमचा पेशा आहे.''

हो-ची मिन्ह जरा वैतागला आणि म्हणाला - ''कदाचित तुम्हा लोकांना माझा अर्थ समजला नसेल. मी पण राजकारण करतो, पण व्यवसायाने मी शेतकरी आहे आणि शेती करतो. शेतीतूनच माझा उदरनिर्वाह चालतो. सकाळ संध्याकाळ मी माझ्या शेतात जातो. मी काम करतो. राष्ट्रपती या नात्याने मी दिवसा देशाची जबाबदारी पार पाडतो.''

जेव्हा हो-ची-मिन्हने पुन्हा तेच विचारले तेव्हा शिष्टमंडळातील एक सदस्य खांदे उडवत म्हणाला - ''राजकारण हा आमचा व्यवसाय आहे.''

याला भारतीय नेत्यांकडे उत्तर नव्हते हे स्पष्ट आहे. भारतातील ६ लाखांहून अधिक लोकांच्या रोजीरोटीला राजकारणाचा आधार असल्याचे नंतर एका सर्वेक्षणातून समोर आले. आज हा आकडा कोटींवर पोहोचला आहे.

काही महिन्यांपूर्वी, जेव्हा युरोप कोरोनाने उद्धस्त होत होता, डॉक्टरांना सलग अनेक महिने थोडीशी सुट्टीही मिळत नव्हती, तेव्हा एक पोर्तुगीज डॉक्टर रागाने म्हणाला - ''जा रोनाल्डोकडे, ज्याला लाखो डॉलर्स देणार पाहण्यासाठी. मला फक्त काही हजार डॉलर्स मिळतात.''

ज्या देशात तरुण विद्यार्थ्यांचे आदर्श शास्त्रज्ञ, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ नसून अभिनेते, राजकारणी, खेळाडू असतील, त्यांची स्वत:ची आर्थिक प्रगती होईल, पण देशाची कधीच प्रगती होणार नाही, यावर माझा ठाम विश्वास आहे.


सामाजिक, बौद्धिक, सांस्कृतिक, सामाजिकदृष्ट्या देश नेहमीच मागासलेला राहील. अशा देशाची एकता आणि अखंडता नेहमीच धोक्यात राहील.

**ज्या देशात अनावश्यक आणि असंबद्ध क्षेत्राचा दबदबा वाढत राहील, तो देश दिवसेंदिवस कमकुवत होत जाईल. देशात भ्रष्ट आणि देशद्रोही लोकांची संख्या वाढतच जाणार आहे. प्रामाणिक लोक उपेक्षित होतील आणि त्यांना कठीण जीवन जगण्यास भाग पाडले जाईल.**

प्रतिभावान, प्रामाणिक, कर्तव्यदक्ष, समाजसेवक, लढाऊ, देशभक्त नागरिक तयार करण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आपण वातावरण तयार केले पाहिजे.

*(समाजमाध्यमातून साभार.....)*

# डोनाल्ड ट्रम्प जाहीर करत असलेल्या आर्थिक धोरणांकडे एक व्यक्ती म्हणून न बघता अमेरिका देश म्हणून बघितले कि बरेच अर्थ लागतील




आधीच्या अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी घेतलेले निर्णय आणि डोनाल्ड ट्रम्प हे घेऊ पाहत असलेले निर्णय यात जणू काही द्वंद्व असल्याचे भासवले जाते. तसे ते नाही. त्यात एक रनिंग थ्रेड आहे.

तो थ्रेड आहे बदलत्या संदर्भात अमेरिकेचे आर्थिक / जागतिक हितसंबंध केंद्रस्थानी ठेवणे. जागतिक संदर्भ बदलेले की, अमेरीकेची धोरणे बदलतात.

**_ ऐंशीच्या दशकात याच अमेरिकेने (रिगन राष्ट्राध्यक्ष होते, पण ते अनुषंगिक आहे), तिच्या पुठ्‌ठ्याखाली असलेल्या जागतिक बँक आणि नाणेनिधीला वापरून विकसनशील देशांना स्ट्रक्चरल ऍडजस्टमेन्ट प्रोग्रॅम च्या नावाखाली नवउदारमतवादी आर्थिक धोरणे अमलात आणण्यासाठी हात पिरगळले.**

त्याकाळात सर्व जगभर झालेल्या जन आंदोलनात जागतिक बँक / नाणेनिधी वर प्रचंड टीका व्हायची ;

गेल्या १५-२० वर्षात जागतिक भांडवलाचा अजेंडा हिरीरीने राबवला जात आहे, पण जागतिक बँकेचे नाव कोठे आहे ?

कारण ?

कारण मधल्या काळात अमेरिका सहीत इतर विकसित देशातील महाकाय कॉर्पोरेट / औद्योगिक घराण्यांनी ताकद कमावली. अनेक आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदार संस्था खाजगी बँका , प्रायव्हेट इक्विटी , व्हेंचर कॅपिटल, हेज फंड , सोव्हेरीन वेल्थ फंड, विमा आणि पेन्शन फंड तगडे झाले , तेच आता अटी घालतात.

त्याशिवाय मधल्या ३०-४० वर्षात गरीब / विकसनशील देशात तयार झालेला राज्यकर्ता वर्ग ग्लोबल एलिट क्लबमध्ये सामील झाला. त्याने स्वतःच नवउदारमतवादी आर्थिक तत्वज्ञान आत्मसात केले. हात पिरगाळण्याची गरज उरली नाही. जागतिक बँकेने भूमी नांगरून दिली आणि ती बाजूला झाली आता तीच गोष्ट जागतिक व्यापार संघटनेची.

अमेरिकादी विकसित देशांना आपल्या अर्थव्यवस्थेतील वर्षानुवर्षांच्या मंदीवर मात करण्यासाठी आंतरराष्ट्रीय आयात निर्यात वेगाने वाढायला हवी होती. अमेरिकेने किंवा एका देशाने दादागिरी करून गरीब राष्ट्रांना सांगण्याचे राजकीय दुषपरिणाम होणार होते

त्याऐवजी एक जणूकाही स्वतंत्र / निष्पक्ष , नियमावर आधारित आंतरराष्ट्रीय व्यापार स्थापित करणे गरजेचे होते. ती नियम वही सभासद राष्ट्रांच्या सहमतीने बनवली आहे हे स्थापित करणे गरजेचे होते. त्यातून डब्ल्यूटीओ स्थापन केली गेली

**अमेरिकेची गोची विकसनशील राष्ट्रांनी , विशेषतः चीनने केली. अमेरिकेने बनवलेल्या पीचवर चीनने अमेरिकेच्या गोलंदाजीवर प्रचंड फटकेबाजी केली. त्याला भारतासकट, फक्त ब्रिक्स नाही अगदी इंडोनेशिया, व्हियेतनाम यांनीदेखील हातभार लावला. हे असे होऊ शकते याचा अंदाज अमेरिकेला आला नाही. आता वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन अडचणीची ठरू लागली**

आता अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपन्या एवढ्या ताकदवर झाल्या आहेत कि त्या अमेरिकन राष्ट्राध्यक्ष कोण होणार यावर निर्णायक प्रभाव पाडत आहेत. आता त्या चीनसकट सर्वच राष्ट्रांशी समोरासमोर वाटाघाटी करू शकतात. वेळ पडेल त्यावेळी अमेरिकन नेशन स्टेटचे रिव्हॉलव्हर वाटाघाटींच्या टेबलवर ठेवू शकतात.

ट्रम्प चीनला देत असलेली धमकी ही वाटाघाटींच्या टेबलवर निगोटिएटिंग चिप्स म्हणून वापरली जाणार हे नक्की. डोनाल्ड ट्रम्प राजकारणी नंतर, बिझिनेसमन आधी आहेत

**वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन वर अमेरिकन औषध निर्माण कंपन्याची जबरदस्त पकड होती. त्यांनी त्याचा फायदा करून घेतला. कोविडवरील लस बनवून कोणत्या अमेरिकन कम्पनीने बिलियन्स डॉलर्सचा धंदा केला हे गुगल सांगेल. डब्लूएचओमधून अमेरिका बाहेर पडल्यावर अमेरिकन औषध कंपन्यांच्या आंतरराष्ट्रीय धंद्यावर काहीही परिणाम होणारा नाही.**

आंतरराष्ट्रीय क्लायमेट चेंज परिषदेतून अनेक कारणांमुळे कार्बन ट्रेडिंगचे मार्केट उभे राहू शकले नाही. नाहीतर अमेरिकन वित्त भांडवलाने ते व्यासपीठ सहजपणे सोडले नसते

व्यक्ती सिस्टिमला चेहरे पुरवतात; त्या त्या काळातील पोलिटिकल इकॉनॉमी काय आणि त्याचे ड्रायव्हर्स / ढकलशक्ती कोणत्या आहेत हे शोधून काढले की, वरकरणी गुंतागुंतीची प्रकरणे थोडीबहुत कळू लागतात.

***– संजीव चांदोरकर***

# ट्रम्प यांची स्थलांतरितांविरोधी कारवाईः सुरक्षा की, आर्थिक आणि राजकीय रणनीती ?

**डोनाल्ड ट्रम्प यांचा, अमेरिकेत आलेल्या 'तथाकथित' बेकायदेशीर स्थलांतरिताविरुद्धच्या कारवाईमागील दीर्घकालीन अजेंडा... दहशत बसवणे... राहायचे असेल तर, दुय्यम नागरीक म्हणून रहा, हे बजावणे! कोणत्याही राष्ट्राला, देशात बेकायदेशीरपणे आलेल्या स्थलांतरितांविरुद्ध कारवाई करण्याचे अधिकार असले पाहिजेत हे तत्व सर्वमान्य आहे...**

डेमोक्रॅटिक पक्षाचे बराक ओबामा आणि त्यानंतर, बायडेन यांच्या राजवटीतदेखील नियमितपणे हजारोंच्या संख्येने अमेरिकेत आलेल्या बेकायदेशीर स्थलांतरितांना मायदेशी पाठवले जातच होते. त्यांचे एकत्रित आकडे काही लाखात आहेत... पण, ज्या पद्धतीने, हातकड्या घालून, हायव्होल्टेज मीडिया कव्हरेज देऊन, डोनाल्ड ट्रम्प राजवट हे करु पाहत आहेत, त्यामागे एक अजेंडा दिसतो.

काही अंदाजाप्रमाणे, अमेरिकेत ११० लाखांपेक्षा जास्त स्थलांतरित असावेत, ज्यांच्याकडे आवश्यक ती कागदपत्रे नाहीत. हे सर्व एक कोटी लोक चोऱ्यामाऱ्या, ड्रग ट्रॅफिकिंग किंवा भीक मागत फिरत नाहीत. ते अमेरिकेतील अनेक उत्पादक उद्योगांमध्ये आत्यंतिक श्रमाची, मानवी शरीराला अपायकारक, आयुर्मान कमी करणारी कुशल, अर्ध-कुशल, अकुशल कामे करतात.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या राजवटीलादेखील माहित आहे की, यातील सर्वच्या सर्वांना देशाबाहेर काढणे अनेक कारणांमुळे खर्चिक आणि अव्यवहार्य आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, तसे केलेच तर, अमेरिकेची अर्थव्यवस्था मंदावूच नव्हे; तर, काही क्षेत्रात चक्क कोलमडून पडू शकते. उदा. बांधकामक्षेत्र... ज्यात मोठ्याप्रमाणावर हीच लोकं काम करतात.

या स्थलांतरितांना कामावर ठेवणारे एम्प्लॉयर, छोट्या-मोठ्या कंपन्या, लेबर कंत्राटदार, ट्रम्प प्रशासनावर दडपण आणणार हे नक्की. किंबहुना, त्यांना विश्वासात घेऊनच ही सगळी ड्रामेबाजी सुरु असेल...

-मग, हे सगळे करण्यामध्ये उद्दिष्ट काय असेल? उद्दिष्ट एकच, दहशत माजवणे!

कागदपत्रे नसलेल्या स्थलांतरितांपैकी काही ...पृष्ठ क्र. १२ वर

# “अर्वाच्चतेची लाट: सोशल मीडियावरील बिघडलेली प्रवृत्ती”

**जेमतेम काही वर्षांपूर्वी एका युट्यूबरची आपल्या अख्ख्या देशात ‘हवा’ झाली होती. ‘कॅरीमिनाटी’ हे त्याचं नाव. एक तरुण पोरगा अत्यंत अर्वाच्य शिव्या देत त्याचं म्हणणं मांडत होता आणि लोकांनी त्याला डोक्यावर घेतला होता, किंबहुना अजूनही लाखोजण त्याला फॉलो करतात. त्याच्या फॉलोअर्समध्ये अत्यंत उच्चशिक्षित नि हायप्रोफाईल तरुण तरुणींचा भरणा मोठ्या प्रमाणात होता नि आहे. शिव्या हा आपल्या जीवनाचा एक भाग आहे पण शिव्या हेच जगण्याचे व प्रसिद्धीचे साधन झाल्याचे दिसू लागलेत!** (REPOST)

मध्यंतरी पिंपरी परिसरात अटक झालेल्या ‘थेरगाव क्वीन’ नामक तरुणीचा गुन्हा आहे की, ती अत्यंत अश्लील अर्वाच्य शिव्या देतानाच धमक्याही देते. तिच्या फॉलोअर्समध्ये ग्रामीण आणि शहरी युवावर्गाची भरती आहे. ती इन्स्टाग्राम रील्स बनवत होती. अशी उदाहरणे आता पायलीला पासरीभर झालीत!

इथे फेसबुकवर प्रोफाईल लॉक करून आपली ओळख लपवून बसणाऱ्या अनेक भेकड नि छद्मी युजर्सकडून त्यांना न आवडणाऱ्या पोस्ट्सवर गोंधळ घातला जातो.

आईबहिणींवरून शिव्या दिल्या जातात. अत्यंत गलिच्छ भाषा वापरली जाते. विशेष बाब म्हणजे त्यांच्या बाजूने असणाऱ्या अन्य महिला पुरुष युजर्सना याचे काहीच वाईट वाटत नाही. उलटपक्षी चेकाळून जाऊन अशांना खतपाणी घातले जाते.

**टीकटॉक जोमात होते तेंव्हा तलवारीने कथित ‘बड्डे’ केक कापण्याचे फॅड जोरात होते, ‘मुळशी पॅटर्न’मधल्या एका पात्राची ती देण होती. आता सर्रास खेडोपाडीदेखील तलवारीने केक कापला जातो.**

**आयुष्यात बाकी काही आलं नाहीतरी चालेल मात्र छपरीपणा आला पाहिजे हे आताच्या पिढीवर छान बिंबवले जातेय.**

अलीकडील काळात कोणत्याही राजकीय पक्षाच्या स्थानिक वा राज्य पातळीवरील प्रवक्त्यांचे, नेत्यांचे बाइट्स पाहिले तर लक्षात येईल की, बेलाशक शिवराळ भाषा वापरली जाते.

वाहिन्यांवरील चर्चादेखील विषय समजून घेण्याच्या पद्धतीने न होता आरडाओरडा नि गोंगाट यांत पार पडतात.

डॉनल्ड ट्रम्प हाराकिरी करत होते तेव्हा अमेरिकेत कॅपिटॉल इमारतीवर हल्ला करत तिथली तरुणाई जेव्हा लोकशाहीवर चालून गेली होती तेंव्हा त्याचे आवतण जेक अँजेली उर्फ केनॉन शेमन या सोशल मीडियावरच्या धटिंगणाने दिलेलं होतं.

**विविध मान्यवर दैनिकांचे वेबपोर्टल्स नुसते चाळले तरी दिसेल की, अमक्या नटीने कसे क्लिवेज दाखवले, तमकी नटी कशी पाठ उघडी टाकून ब्रालेस आहे, फलाणा कुठे हनिमूनला गेलाय आणि बिस्ताना कुठे भानगडी करतोय ! अशा एक ना अनेक बातम्यांचा (?) आढावा देतानाच अत्यंत भडक बीभत्स नि कथित मादक छायाचित्रांचा तिथे भडीमार असतो !**




अपवाद वगळता कुणालाही खोलात जाऊन वाचायचे नसते, मुद्दे जाणून घ्यायचे नसतात, आपला आवाका वाढवून घ्यायचा नसतो, अचूक खरी माहिती नि ज्ञानसंवर्धन इत्यादी बाबी तर जणू गौणच ठरताना दिसताहेत.

इथे कुणी जेंव्हा बोलत असतो वा काही मते मांडत असतो तेंव्हा मुळात ते ऐकले जाते केवळ प्रतिवाद करण्यासाठी ! भूमिका जाणून घेऊन आपली मते वा आपलं म्हणणं त्यानुसार पारखून घेणं इत्यादी आता होत नसतं.

अशा काळात उगम पावलेलं एक बांडगूळ ‘हिंदुस्थानी भाऊ’ आहे ! हा इसम अत्यंत गलिच्छ भाषेत शिव्या देत असतो त्यामुळे त्याची देशभक्ती खरी ठरत असावी.

त्याचं ते पचास तोला टाईप राहणं अनेकांना आवडतं, त्याची भडक वेशभूषा अनेकांना आवडते.

त्याचे फॉलोअर्स लाखोत आहेत. तेदेखील इतरांच्या पोस्ट्सवर जाऊन आईबहिण एक करत असतील तर, त्यात नवल ते काय ?

हे सर्व कुठून आलं ?

हे आजूबाजूला होत असताना आपण सर्व काय करत होतो ?

की आपणही यात सामील होतो ?

या सर्व गदारोळात आपली भूमिका कशी होती आणि आता त्याविषयी काय वाटते ?

हा प्रश्न ज्याने त्याने स्वतःला विचारायचा आहे.

शून्य कर्तृत्व असताना कुणालाही शिव्या देणं, तद्दन बाजारू राहणं, लोकहिताला बाधा आणणारा लोकानुनय करणं, भडक जहाल व्यक्त होत राहणं याच्या आधारे काही माणसं लोकमानसावर राज्य करून आहेत.

**आता असे काय उरलेय ज्यात सौम्य, सात्विक, विचारी नि शैलीदार व्यक्त होता येतं? बहुधा काहीच नाही. अपवादांना सर्वंकष स्वरूप देता येत नाही हे शल्य अशा वेळी डाचते, नाही का !**

‘हिंदुस्थानी भाऊ’ नामक फटीचर बोलभांड आपल्या सर्वांच्या मोबाईल, लॅपटॉप, कॉम्प्युटरमध्ये आणि सोशल मीडिया अकाउंटमध्ये सामील आहे.

इथे फेसबुक, इन्स्टासह अनेक अकाऊंट्स केवळ शिव्यागाळी, अर्वाच्य अश्लील शेरेबाजीने शिगोशिग भरल्याचे जाणवू लागलाय.

हे सर्व माणसं आपल्या अवतीभवती नि गल्लीबोळात आहेत, इव्हन ते आपल्यापैकी काहींच्या घरांतदेखील पोहोचले असावेत, सभ्य पांढरपेशी मनात रूजताहेत.

त्यांना आवरायचं कसं हा खरा प्रश्न आहे!

आपण जे पेरलेय तेच उगवते आहे !

***– समीर गायकवाड.***

---

लॅटिन अमेरिका, आफ्रिका, आशियामध्ये अनेक हुकूमशाही व नृशंस राजवटी होत्या किंवा आहेत, ज्यांचा ‘समाजवादा’शी अर्थाअर्थी काडीचाही संबंध नसतो. त्या बहुतांश, अमेरिकेच्या तालावर नाचणार्या क्रूर-विकृत हुकूमशहांच्या असतात. तिथे ‘भांडवलशाही’चा नंगानाच सुरु असतो...पण, त्या ‘भांडवलशाही’च्या क्रूर-विकृत स्वरुपाविषयी ना अमेरिकेतल्या, ना भारतातल्या प्रसारमाध्यमांतून अवाक्षर काढलं जात, ना त्याची कुठे फारशी चर्चा होते व त्यामुळेच, ‘साम्यवाद-समाजवादा’विषयीचं जनतेतलं अज्ञान व आकस, जराही क्षय न होता टिकून रहातो, असंच नव्हे; तर, तो ‘फणा’ काढून सदैव कसा उभा राहील किंवा विविध रुपातून कार्बोनेटेड शीतपेयातून म सफसून बाहेर मे कल्या जाणाऱ्या वायूसारखा सतत कसा मे कला जात राहील, हे व्यवस्थेकडून काळजीपूर्वक पाहिलं जातं.

***...राजन राजे (भाई)***

---

## ट्रम्प यांची स्थलांतरितांविरोधी कारवाई...

...पृष्ठ क्र. ११ वरुन

दशहजार, चर्चेसाठी अगदी लाखभर धरा, लोकांना वाईट पद्धतीने वागणूक देऊन, बेड्या घालून, लष्करी अधिकाऱ्यांच्या निगराणीखाली, लष्करी विमानाने, त्यांचा आत्मसमान खच्ची करुन, त्यांना परत पाठवले जाईल...

त्याचा मेसेज ज्यांच्यावर कारवाई होणार नाहीये त्यांना जाईलच; पण, ज्या स्थलांतरितांकडे आवश्यक ती कागदपत्रे आहेत, त्यांच्यापर्यंतदेखील जाईल. तो कसा पोहोचेल हे बघितले जाईल...

भविष्यात हे लाखो स्थलांतरित, कागदपत्रे असलेले आणि नसलेले, प्रचंड असुरक्षिततेमध्ये काम करतील, दिले जाईल ते वेतन स्वीकारतील, सांगितलेले काम करतील, सांगितले जाईल तितके तास काम करतील आणि मुख्य म्हणजे कोणाकडेही, कोणतीही तक्रार घेऊन जाणार नाहीत...

कमी वेतनात, जास्तीतजास्त काम काढले जाईल. त्या प्रमाणात नफ्यात वाढ होईल!

मानवी श्रमांवर दहशत बसवणे, सतत सर्व प्रकारच्या असुरक्षिततेमध्ये ठेवणे, हे काळाच्या कसोटीवर उतरलेले, जुने वर्गीय टेक्निक आहे... आणि, हे करतांना ट्रम्प आपली गौरवर्णीय पोलिटिकल कॉन्स्टिट्यूअसी बळकट करत आहेत !!!

***....संजीव चांदोरकर***

# "मजुरी संकट: भांडवलशाहीचा डाव आणि शासनाचे सहकार्य"

'एल अँड टी'सारख्या औद्योगिक कंपनीला मजूर न मिळणे आणि ग्रामीण भागात शेतीसाठी मजूर न मिळणे हे दोन पूर्णपणे भिन्न प्रश्न आहेत.

वैचारिक, विश्लेषणात्मक मांडणी अचूक हवी नाहीतर तुमचे राजकीय विरोधक तुमच्याच मांडणी मागे लपायला जागा शोधतात.

'एल अँड टी'सारख्या औद्योगिक कंपन्यांना मजूर मिळत नाहीत; कारण, या महाकाय कंपन्या, शक्य असूनदेखील मानवी श्रमाला अधिक मजुरी देऊन मजूर आकर्षित करायला तयार नाहीत

ग्रामीण भागात शेती आणि अनुषंगिक कामांना मजूर मिळत नाहीत कारण मुळात शेतीच आतबट्ट्याची होत चालली असल्यामुळे शेतकऱ्यांना आवश्यक ती मजुरी देऊन श्रमिकांना आकर्षित करता येत नाही.

पहिल्या प्रकारात नफा कमी होईल म्हणून मजुरी वाढवली जात नाही. तर दुसऱ्यात तोटा वाढेल, कर्ज काढून अधिकची मजुरी द्यावी लागेल म्हणून.

कॉर्पोरेट औद्योगिक क्षेत्रातील मजुरांच्या तुटवड्याचा प्रश्न ते क्षेत्र स्वतःहून सोडू शकते. शेती क्षेत्रातील मजुरांचा प्रश्न संरचनात्मक आहे. तो शासनाच्या धोरणात्मक आणि अर्थसंकल्पीय पाठिंबा शिवाय सुटणारा नाही.



खालील आर्थिक सिद्धांत सांगा कोणीतरी त्या ए'एल अँड टी'च्या सुब्रमण्यमना.

मार्केट इकॉनोमी मध्ये मागणी पुरवठ्याचे तत्व सांगितले जाते. मागणी आणि पुरवठ्याच्या रेषा जिथे परस्परांना छेदतात त्या बिंदूला मार्केट प्राईस म्हणतात. त्या बिंदूवर मागणीदार आणि पुरवठादार यांचे किमती बाबत एकमत झाले आहे असे मानले जाते.

**मानवी श्रमाचा मागणी पुरवठा ग्राफ काढा**

मानवी श्रमाच्या मागणीदाराला (म्हणजे 'एल अँड टी'च्या सुब्रमण्यम यांना) मानवी श्रमाच्या पुरवठादारांकडून (म्हणजे देशातील श्रमिकांकडून) मानवी श्रमाचा जास्त पुरवठा व्हावासा वाटतो. फाईन. कृती काय करतात ?

त्यांनी मानवी श्रमाची मार्केट प्राइस वाढवत न्यावी की. एवढी वाढवावी की ज्या प्राइसला श्रमिक त्यांचे आत्ताचे आयुष्य बदलून त्यांच्याकडे श्रम विकायला जातील. पुरवठा वाढवतील.

हे सगळे आर्थिक सिद्धांत अनेक कंपन्यांतील सुब्रमण्यम (अनेकवचनी) यांना माहीत आहेत. पण सिद्धांताप्रमाणे वागले तर त्यांच्या नफ्याच्या पातळीवर परिणाम होतो. शेयर प्राईस कमी होते. सीईओ आणि अधिकाऱ्यांचे बोनस कमी होतात.

त्यापेक्षा नागरिकांना जास्तीत जास्त डिस्ट्रेसमध्ये ठेवले गेले तर ते कमी वेतनावर काम करायला तयार होतील हे त्यांना हवे आहे.

त्यासाठी त्यांना शासन व्यवस्थेने मनरेगा साठी तरतुदी न वाढवणे, डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर योजनांमध्ये टोकनिझम ठेवणे किंवा शक्य झाले तर बंदच करणे हे हवे आहे.

कॉर्पोरेट भांडवलशाहीची गोची ही आहे की, त्यांना हवा तो पक्ष सत्तेवर येण्यासाठी त्या पक्षाने मतदार नागरिकांना आकर्षित करण्यासाठी अशा योजना लाँच करणे हवे आहे.

पण तो पक्ष सत्तेवर आल्यावर, निवडणुका जिंकल्यानंतर त्या पक्षाने या योजना हळूहळू गुंडाळ्यात अशी त्यांची इच्छा आहे.

*...संजीव चांदोरकर*

# लहानपणीच्या "शिवाजी म्हणतो" खेळाचा, अमेरिकन अवतार "अंकल सॅम" म्हणतो...

**अंकल सॅम म्हणाला होता, आम्हाला नाटो (NATO) मध्ये युक्रेन हवे आहे. आम्ही युक्रेनचे दोस्त आहोत. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्सकी आमचे हिरो आहेत... आता अंकल सॅम म्हणतो,**

**मला युक्रेन नाटोमध्ये नको आहे. आमचा युक्रेन नाही, रशिया दोस्त आहे. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेंस्की वाईट माणूस आहे.**

**मधल्या काळात हजारो माणसे मेली, लाखो लोकांची घरे, शहरे, पायाभूत सुविधा उध्वस्त झाल्या. मानवी यातनांचे तर, डॉलर्समध्ये मूल्यदेखील काढता येणार नाही. यातून बाहेर यायला काही पिढ्या आणि काही ट्रिलियन डॉलरचे भांडवल लागेल.**

**कोण जबाबदार?**

**अंकल सॅम म्हणाला होता,**

सर्वांनी आपापल्या अर्थव्यवस्थांचे दरवाजे सताड उघडे ठेवा. सीमारहित देश हवेत. आयात-निर्यात मुक्त हवी. यापुढे 'जागतिक व्यापार संघटना' (WTO) जागतिक व्यापाराचा मॉनिटर असेल. सर्वांनी तो मॉनिटर जे म्हणेल ते ऐकले पाहिजे.

**आता अंकल सॅम म्हणतो,**

आता मला आमच्या अर्थव्यवस्थेचे स्वसंरक्षण करायचे आहे. त्यासाठी आम्ही भरपूर आयात कर लावणार. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार कमी झाला तरी आम्हाला फरक पडत नाही. अनेक गरीब आणि विकसनशील देशांमध्ये निर्यात प्रधान उद्योग वाढावा म्हणून, हजारो कोटींची केलेली



गुंतवणूक आणि रोजगार आता धोक्यात येऊ शकतात. या देशांची चलने घसरुन, महागाई वाढू शकते. स्थूल अर्थव्यवस्थेवर अनेक विपरीत परिणाम होऊ शकतात.

अंकल सॅमने नेमलेला मॉनिटर आणि त्याचे सूटेड-बूटेड दलाल अर्थतज्ज्ञ, जे जगाला मुक्त व्यापाराचे ज्ञान पाजत, गेली ४० वर्षे ग्लोब ट्रॉटिंग करत होते, आता बिळात जाऊन बसले आहेत. सांगितले होते कोणी एवढ्या बेकनिक वेगाने जागतिकीकरण करायला?

कोण जबाबदार?

**अंकल सॅम म्हणाला होता,**

आम्हाला स्वस्तात मानवी श्रम विकणारे श्रमिक हवे आहेत. तर, तुम्ही आमच्या देशात या. त्याशिवाय आमच्या देशातील मुलामुलींचा उच्च शिक्षणाकडे कल नाही. तुमच्या देशातील मुलांना डॉलरमध्ये फिया भरुन, कर्जे काढून, आमच्या उच्चशिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थी म्हणून पाठवा, आम्ही त्यांना जॉब देऊ.


आता अंकल सॅम म्हणतो, तुम्ही भले अनेक वर्षे आमच्या देशात स्थलांतरित म्हणून राहत असाल; पण, तुमच्याकडे आम्हाला पाहिजे तशी कागदपत्रे नाहीत. आता आम्ही एकेकाला निवडून निवडून हातात आणि पायात बेड्या घालून त्यांच्या मायदेशी पाठवणार.

अंकल सॅम हे म्हणत नाही की, अनेक वर्षांपूर्वी ही लोकं, ज्यावेळी अमेरिकेत गेली त्यावेळी ते आम्हाला हवे असल्यामुळे, आम्ही त्यांच्याकडे आवश्यक ती कागदपत्रे नाहीत, याकडे कानाडोळा केला. आता, या लोकांना देशाबाहेर काढण्यासाठी जी यंत्रणा राबवली जाते, तशीच कडक यंत्रणा प्रवेश करताना का लावली गेली नाही?

परिणामी, जगातील अनेक गरीब विकसनशील देशांमध्ये, स्थलांतरितांच्या कुटुंबात प्रचंड अनिश्चितता आणि नैराश्य पसरले आहे. कर्ज काढून अमेरिकेत शिकायला पाठवलेल्या विद्यार्थ्यांनी, अमेरिकन युनिव्हर्सिटीना मिलियन डॉलर्सचा धंदा दिला आणि उरलेले आयुष्य, ते कर्ज कसे फेडायचे या चिंतेत घालवणार आहेत.

*....संजीव चांदोरकर*

# निरपराध नथुरामला नाहक फाशी दिले, गांधी तर सुखरूप बचावले!



**गांधीहत्या ही सगळ्यात मोठी अफवा निघाली तर! नथुराम गोडसेच्या पिस्तुलातून झाडलेल्या गोळीने महात्मा गांधीजींची हत्या झालीच नाही, असा दावा रणजीत सावरकर यांनी केलाय. आणि, तो खराय!!!**

**३० जानेवारी–१९४८ रोजी नथुराम गोडसे या 'माथेफिरु'ने मोहनदास करमचंद गांधी नावाच्या ७८ वर्षांच्या एका वयोवृद्धाची हत्या केली. त्यामुळे नथुराम फासावर चढला. पण, प्रत्यक्षात तर हा सारा बनाव निघाला! नथुरामने हल्ला केला हे खरे, पण मोहनदास करमचंद गांधी या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेच नाहीत. ते बचावले. तरीही बापड्या नथुरामला फासावर दिले गेले. आणि, इकडे गांधी मात्र आजतागायत जिवंत आहेत. यंदा हेच गांधी १५५ वर्षांचे होत आहेत. न केलेल्या खुनासाठी नथुराम फासावर चढला, त्याचे काय करायचे? कोणत्या न्यायालयात त्यासाठी दाद मागायची?**

नथुरामने केलेल्या हल्ल्यातून गांधी वाचले नसते, तर पुन्हा त्यांचा खून करण्याची वेळ का आली असती? वि. दा. सावरकरांनी स्थापन केलेल्या हिंदू महासभेच्या राष्ट्रीय सचिव असलेल्या एका महिलेने मागे ३० जानेवारीलाच गांधींचा खून करण्याचा पुन्हा प्रयत्न केला होता.

असा प्रयत्न पुन्हा पुन्हा करावा लागतो, तरी गांधी मरत नाही. हे काय प्रकरण आहे? गांधींना ना कोणती सुरक्षा व्यवस्था ना खास काही, तरी गांधींना मारता का येत नाही? अनवाणी पायांनी थेट गर्दीत घुसणारा हा लहान चणीचा, उघडा, वयोवृद्ध माणूस खून करण्यासाठी किती सोपा! कोणी यावे आणि त्याच्या विरोधात हवे ते बोलावे. वाटेल तसे वाह्यात जोक्स करावेत. नाटक- सिनेमांतून मस्त बदनाम करावे. एवढे सारे सोपे. तरी तो मरतही नाही आणि बदनामही होत नाही. आता तर 'गांधी- १५०' नावाने मस्त सेलेब्रेशनच सुरू झाले आहे. तिकडे नथुराम नाहक फासावर चढला आणि इकडे हा माणूस मात्र महात्मा म्हणून मिरवतोच आहे. पूर्वी 'गांधी जिथे असतील तिथे' अशा पत्त्यावर पत्रं जायची आणि गांधींना ती मिळायची. अवघा देश पिंजून काढणारा हा मांणूस आजही देशभर फिरतो आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी जगभर फिरत असतात. (क्वचित भारतातही असतात!) प्रत्येक ठिकाणी सोबत ते याच गांधींना घेऊन जातात. कधी गांधी बसलेल्या ट्रेनमध्ये ते बसतात. कधी गांधींच्या म्युझिअमला भेट देतात. कधी गांधींचं एखादं पेंटिंग त्यांना कोणी भेट देतं. गांधींच्या देशातनं आलोय, असं ते जगभर सांगत असतात आणि गांधीही मिस्कील हसत मोदींबरोबर जग फिरत असतात. ऐन तारुण्यात फासावर गेलेला नथुराम नाहक मारला जातो आणि इथे हा वयोवृद्ध माणूस तर आणखी वयोवृद्ध होत जगभर भटकताना दिसतो.

**गांधींवर हत्या करण्याचे आजवर किती प्रयत्न झाले, त्याची मोजदादच नाही. इतिहास सांगतो की असे अकरा हल्ले झाले. आफ्रिकेतल्या २१ वर्षांच्या कालावधीत गांधीजींवर तीन जीवघेणे हल्ले झाले. भारतात आठ हल्ले झाले. भारतात झालेले सगळे हल्ले केले ते हिंदुत्ववाद्यांनीच. जे गांधी स्वतःला 'सनातन हिंदू' म्हणवून घेत, रघुपती राघव राजाराम, अशी भजनं आळवत, भगवद्गीतेला आईसमान मानत, त्यांचा हिंदुत्ववाद्यांना त्रास का बरं झाला असेल?** गांधींवर झालेला पहिला हल्ला २५ जून १९३४ चा. पुण्यातच तो झाला. हरिजन यात्रेत भाग घेण्यासाठी गांधीजी आले होते. हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांनी त्यांचा निषेध केला. काळे झेंडे दाखवले. गांधींच्या गाडीवर बाँब फेकला गेला. अंदाज चुकला आणि गांधी वाचले. दुसरा हल्ला झाला तो पाचगणीत. भिलारे गुरुजींनी त्या हल्ल्यातून गांधींना वाचवलं. तिसरा हल्ला सेवाग्रामच्या दारासमोरच झाला. ९ सप्टेंबर १९४४ ची ही घटना. गांधीजींनी जीनांबरोबर बोलणी सुरू केली होती. त्यामुळे संतापलेल्या नथुराम आणि टीमने हा हल्ला केला. २९ जून १९४६ च्या रात्री गांधींना घेऊन जाणाऱ्या गांधी स्पेशल गाडीला घातपात करण्याचा प्रयत्न झाला. २० जानेवारी १९४८ रोजी बिर्ला हाऊसमधील प्रार्थना सभेच्या वेळी एकाने गावठी बॉम्बचा स्फोट केला. त्यानंतर ३० जानेवारी १९४८ चा हल्ला. या हल्ल्यात गांधीजींची हत्या झाली, असा समज होता. मात्र, ३० जानेवारी २०१९ च्या हल्ल्याने हे स्पष्ट झाले की, त्या हल्ल्यातूनही गांधी बचावले होते.

**असाच एक हल्ला झाल्यावर गांधी म्हणाले होते, 'मला मारुन कोणाला काय मिळणार आहे ते समजत नाही. पण, तुम्ही कितीही प्रयत्न केले तरी मी काही मरणार नाही. मी किमान १२५ वर्षे जगणार आहे.' आणि, अखेर हे शब्द खरेच झाले तर. १५० वर्षे झाली तरी गांधी आहेतच. ते मरत नाहीत. पाकिस्तानला ५५ कोटी देण्याच्या निर्णयामुळे गांधींवर हल्ला झाला, असे म्हणणाऱ्यांकडे १९३४ मध्ये असे कोणते कारण होते, ज्यामुळे गांधींवर हल्ला झाला! असे काय कारण होते की तथाकथित हिंदुत्ववाद्यांचाच गांधींना विरोध होता?**

एक घटना बोलकी आहे. तुषार गांधींच्या 'लेट्स किल गांधी' या पुस्तकात ती आहे. खून करण्यापूर्वी नथुराम एकदा गांधींच्या आश्रमात आला होता. पुण्यातल्या उरळी कांचन आश्रमातली गोष्ट आहे ही. भेट म्हणून त्यानं गांधीजींसाठी एक टोपली आणली होती. त्यात फळं आहेत, असं तो म्हणाला. सुशीलानं ती टोपली घेतली. त्याला गांधीजींना भेटायचं होतं. पण, 'बापू कामात असल्याने भेटू शकणार नाहीत', असं सुशीलानं सांगितलं. तिनं त्याला नाव विचारलं. पण, त्यानं नाव सांगितलं नाही. तो अस्वस्थ वाटत होता. अखेर तो निघून गेला. नंतर टोपली उघडून पाहिली, तर त्यात जुने-पुराणे, फाटके जोडे, चपला असे काहीतरी निघाले. शिष्य संतापले. पण, गांधी हसले आणि म्हणाले, 'हे विकून जे पैसे मिळतील, ते हरिजन फंडामध्ये जमा करा.' तसे चार रुपये हरिजन फंडात जमा झाले. हे दुस-या दिवशी गांधीजींनी प्रार्थनेत सांगितल्यामुळे नथुरामला समजले. तो भडकलाच. चुकून का असेना, आपण हरिजन फंडाला मदत केली, या कल्पनेने तो संतापला. आश्रमात त्यानं गोंधळ घातला. 'हरिजन निधीला ते पैसे दान करण्याची परवानगी मी दिली नव्हती', असे म्हणत तो पैसे परत मागू लागला. सरदार पटेलही तेव्हा तिथे होते. प्रार्थनासभेतून नथुरामला जबरदस्तीने बाहेर काढावे लागले. त्याचा चेहरा मात्र सर्वांच्या लक्षात राहिला. ३१ जानेवारी १९४८ रोजी त्याचा फोटो वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाला, तेव्हा सर्वांना ती घटना आठवली.

मोहनदास करमचंद गांधी नावाचा हा माणूस भारतात परतला ते १९१५ मध्ये. तेव्हा त्यांचे वय होते ४६. आफ्रिकेत २१ वर्षे गांधी होते. त्यानंतर ते भारतात आले. येताना आफ्रिकेतील वलय त्यांच्यासोबत होतेच. ती सक्सेस स्टोरीही होती. पण, त्यानंतर अवघ्या चारपाच वर्षांत गांधी देशाचे नेते होतील, अशी कल्पनाही कोणी केली नसेल. तेव्हाचा देश, जिथे भारत, पाकिस्तान, बांग्लादेश, म्यानमार हे सारे एकत्र होते. अशा देशाचा सर्वोच्च नेता होणं ही सोपी गोष्ट थोडीच आहे! अशा कालखंडात की जेव्हा दळणवळणाची साधनं नाहीत. संवादाची माध्यमं नाहीत. आजच्यासारखं ना इमेज मेकिंग आहे ना कोणतं व्यवस्थापन! अशा काळात गांधी देशाचे नेते झाले. फक्त नेते नाहीत झाले, त्यांनी अवघा देश स्वतःसोबत उभा केला.

देशासोबत स्वतःला उभं केलं. लोकांच्या शहाणपणावर विश्वास ठेवत गांधी घडत गेले आणि गांधींसोबत देश घडत गेला. गांधी हा या देशाचा चेहरा झाला. गांधी या आयकॉनवर क्लिक केलं की भारताची लिंक ओपन व्हावी, अशी जादू झाली.

मोहनदास करमचंद गांधी नावाचा माणूस इथपर्यंत पोहोचला, ते एवढ्या अल्पावधीत, असं समजण्याचं कारण नाही. गांधी हा मुक्काम नाही. गांधी हा प्रवास आहे. गांधी हे अव्याहत 'Becoming' आहे. स्वतःवर एवढे प्रयोग करणारा आणि सतत बदलत गेलेला गांधी समजण्यात आपली फसगत होते तीच मुळी आपण गांधींना 'स्थितप्रज्ञ' मानतो म्हणून. परिवर्तनवादी या शब्दाला जो अर्थ आला आहे, त्या व्याख्येनं आपल्याला गांधी परिवर्तनवादी वाटत नाहीत. विद्रोहीही वाटत नाहीत. गांधींचा मठ करुन टाकणारे गांधीवादी तर या पर्सेप्शनला सर्वात आधी जबाबदार आहेत. प्रत्यक्षात गांधी हे अत्यंत सळसळते, चैतन्यमय असे प्रकरण. बावीस वर्षांनी धाकटे असलेल्या बाबासाहेबांना भेटल्यानंतर, आंतरजातीय लग्नाशिवाय अन्य लग्नाला जाणार नाही, अशी प्रतिज्ञा करणारे आणि अर्थातच ती पाळणारे गांधी.

गांधी हे 'ओरिजिनल थिंकर'. एखाद्या लहानग्याच्या कुतुहलानं प्रत्येक गोष्टीचा विचार करायचा. मग त्यावर आपली अशी मांडणी विकसित करायची. आणि, सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे हे सारं चिंतन कृतीशी जोडायचं. कृतीशी जोडायचं म्हणजे किती! अगदी टोकच गाठायचं. एरव्ही 'नेहमी खरे बोलावे' या सुविचारात नवं ते काय? पण, गांधींच्या हातात असा सुविचार येतो आणि त्यांची अवघी आत्मकथा म्हणजे 'सत्याचे प्रयोग' होऊन जाते. या साध्या साध्या विचारांना महानपण आलं ते त्या विचारांच्या प्रत्यक्ष प्रयोगानं. मग सत्याग्रह हे शास्त्र होऊन गेले आणि तेच शस्त्रही झाले. ही सगळी ...पृष्ठ क्र. १५ वर

# गांधी हत्या, आर्थिक विषमता व अर्थसंकल्प!

प्रा. डॉ. रावसाहेब कसबे लिखित ''गांधी'' (दुसरी आवृत्ती) या ग्रंथातील पृष्ठ क्र. ३३७वर डोळ्यांत अंजन घालणारी 'आर्थिक' माहिती दिली आहे...

**२ मार्च-१९३० साली, व्हाईसरॉय लॉर्ड आयर्विन यांना लिहिलेल्या पत्रात गांधी सांगतात की, १९३० साली व्हाईसरॉय लॉर्ड आयर्विन यांचा पगार रुपये २१,०००/- अधिक, इतर सुविधा इतका होता. त्याच वेळेस सामान्य भारतीय नागरीकाची रोजची मिळकत सरासरी २ आणे इतकी होती. म्हणजे, व्हाईसरॉयची दैनंदिन मिळकत रुपये ७०० पेक्षा अधिक होती व ती सामान्य भारतीयाच्या दैनंदिन मिळकतीपेक्षा सात हजार पटीने जास्त होती!**

आता आपण आजच्या जगात येऊ या... २०२५च्या जानेवारी महिन्यातील हिंदुत्ववादी नथुराम गोडसेकृत, सनातनी हिंदू महात्मा गांधी हत्या दिनी, (३० जानेवारी) इंटरनेटवर शोध घेतला असता, दि. २९ सप्टेंबर-२०२४ रोजीचे 'डेली न्यूज ॲनालिसिस' म्हणजे 'डीएनए' या इंग्रजी दैनिकाचे संकेतस्थळ (वेबसाईट) सांगते की, भारतात मुकेश अंबानींची एका दिवसाची मिळकत आहे, रुपये १६३ कोटी. याउलट सामान्य भारतीयांची मिळकत किती आहे? दि. ३० जानेवारी-२०२५ रोजी, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी संकेतस्थळ सांगते की, २०२४ साली भारताचे दरडोई सरासरी वार्षिक उत्पन्न होते, २९४०/.... यावर्षी रुपया-डॉलर यातील सरासरी विनिमय दर होता, एका डॉलरला ८३/- या दराने भारताच्या दरडोई सरासरी वार्षिक उत्पन्नाला गुणल्यास आपणांस कळते की, २०२४ साली आपल्या देशाचे दरडोई सरासरी वार्षिक उत्पन्न, २,४४,०२०/- होते. या उत्पन्नाला १२ने भागल्यास, आपणांस २०२४ साली भारताचे दरडोई-दरमहा उत्पन्न, २०,३१८/- एवढे असल्याचे कळते. या रकमेला ३०ने भागल्यास, आपणास भारताचे दरडोई-दरदिवशी असणारे सरासरी उत्पन्न भेटते. ते आहे, ६७८/- (अक्षरी रुपये सहाशे अठ्ठ्याहत्तर फक्त)

अर्थ उघड आहे, मुकेश अंबानी दररोज रुपये १६३ कोटी कमावतात व सामान्य भारतीय दररोज रुपये ६७८ कमावतात!

**आता जरा डोकं खाजवा. मुकेश अंबानींचे दैनिक उत्पन्न सामान्य भारतीयाच्या दैनिक उत्पन्नाच्या किती पट आहे? गांधीजींचा हिशोब लावला तर, रुपये ६७८च्या सात हजार पट होतात, रुपये ४७,४६,०००/- फक्त. म्हणजे, सामान्य भारतीयांच्या सरासरी उत्पन्नाच्या सात हजार पट असलेले, सुमारे ४८ लाख रुपये हे, मुकेश अंबानींच्या एका दिवसाच्या १६३ कोटी रुपये, या रकमेच्या खिजगणतीतही नाहीत. ते नेमके किती पट आहेत, ते जरा शोधून काढा!**

**माझा प्रश्न थोडा वेगळा आहे...**

ब्रिटिश अधिकाऱ्यांची, भारतीयांच्या तुलनेत असणारी अवाढव्य मिळकत, हे गांधींच्या स्वातंत्र्यलढ्याचे कारण होते. मग, सामान्य भारतीयांची आजची दैनंदिन व मुकेश अंबानींची दैनंदिन मिळकत यातील फरक, हा आपल्या नव्या स्वातंत्र्यलढ्याचे कारण का होऊ शकत नाही? विशेष म्हणजे, हा फरक सांगून, देशाच्या व्यवस्थेला आवाज देणारा कोणी गांधीदेखील आज नाहीये!

हिंदुत्ववादी नथुराम गोडसेकृत, गांधी हत्या दिनी, आर्थिक विषमता सांगणाऱ्या गांधीजींचे ''हे'' महत्त्व कोणी समजून घेईल का?

मार्क्सवादाकडून व्हाया 'माफुआं' ते सौत्रांतिक मार्क्सवाद, असा टप्पा गाठलेले शरद पाटील, १९व्या शतकाच्या उत्तरार्धातील न्यायमूर्ती रानडे यांचा हवाला देऊन सांगतात की, भारतात ब्राह्मण व मराठा वा तत्सम लष्करी जाती यांची युती तुटणार आहे. उधळ्या लष्करी जातींची जागा मितव्ययी बनिया घेतील. प्रामुख्याने या मितव्ययी बनिया जातीतून, भारतातील उद्योजक निर्माण झाले आहेत. त्यांचा उदय अर्थातच इंग्रज काळात झाला. अर्थतज्ज्ञ डॉ. धनंजय गाडगीळ यांचा हवाला देऊन, शरद पाटील पुढे सांगतात की, भारतातील उद्योजक हे वर्ग नसून, 'इंडियन बिझनेस कम्युनिटी' आहेत. ''भांडवलदार वर्ग'' वेगळा व ''बिझनेस कम्युनिटी'' वेगळी. बिझनेस कम्युनिटी हा शब्दप्रयोग, जातीसंस्थेने प्रभावित झाला आहे; म्हणून, इंडियन बिझनेस कम्युनिटी, जुनी जातीसंस्था संपवायला तयार नाही. या बिझनेस कम्युनिटीचे प्रतिनिधी असलेल्या महात्मा गांधींशी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे, याच मुद्द्यावर मूलभूत मतभेद होते.

या विवेचनाचा सारांश असा की, आज देशात 'इंडियन बिझनेस कम्युनिटी' व ब्राह्मण यांची युती राज्य करीत आहे. गांधीवादाचा प्रभाव असलेल्या स्वातंत्र्योत्तर काळात, या युतीने रेड्डी, मराठा, पटेल, राजपूत, जाट वगैरे मधल्या जातींना ''मुकादम'' म्हणून नेमले. मुकादम हा कामगारच असतो; परंतु, तो मालकाचा 'एजंट' म्हणून काम करतो. गावातील ओबीसी, अनुसूचित जाती-जमाती व धार्मिक अल्पसंख्य यांच्याकडून गावगाडा चालवून घेणे, हे या मुकादमांचे मुख्य काम. बक्षीसी म्हणून, पूर्वी त्यांना राज्यस्तरावरील सुभेदारी मिळत असे. हल्ली तिथेही रा. स्व. संघाने अतिक्रमण केले आहे. त्यामुळे मुकादम मंडळी अगदी शेपटापासून गार पडली आहेत. म्हणून, विदूषकी चाळे करीत ब्राह्मण्यवादापुढे लोंडा घोळणे व शेपूट हलवून आपली इमानदारी सिद्ध करणे, यातच ते आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता समजू लागले आहेत. त्यांना संतोष देशमुखांची निषेधार्ह हत्या दिसते; परंतु, त्याहून गंभीर व निषेधार्ह असलेल्या शेतकऱ्यांच्या स्वहत्या दिसत नाहीत. त्यामुळे देशातील आर्थिक विषमता दूर करणे सोडाच, ते स्वजातीय शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठीही काहीच करुशकत नाहीत!

**या पार्श्वभूमीवर दि. १ फेब्रुवारी-२०२५ रोजी देशाचा अर्थसंकल्प जाहीर होणार आहे. या अर्थसंकल्पाचा अभ्यास करुन, आर्थिक विषमता जनतेला समजावून सांगणे, हे या परमपूज्यनीय देशातील सर्वजातीय-सर्वधर्मीय विवेकशील नागरिकांचे कर्तव्य आहे.**

गांधी हत्या दिनी, निदान यासाठी तरी गांधीजींची आठवण करायला पाहिजे!

*....शुद्धोदन आहेर*

---

**निरपराध नथुरामला नाहक फाशी दिले, गांधी तर सुखरूप बचावले!** ...पृष्ठ क्र. १४ वरुन

शस्त्रं आणि शास्त्रं त्यांनी विकसित केली, त्यात कोणतंही 'रॉकेट सायन्स' नव्हतं. मोहनदास करमचंद गांधी नावाच्या सामान्य माणसानं, त्याच्या साध्या आकलनातून विकसित केलेलं हे विज्ञान होतं. गांधी हा काही 'थोर' वगैरे माणूस नव्हता. तो कोणताही ईश्वरी अवतार वा प्रेषित नव्हता. त्याचं असामान्यत्व हेच की तो निखळ, निरागस, प्रामाणिक असा सामान्य माणूस होता. आपण सकाळी खातो काय इथपासून ते सकाळच्या शौचापर्यंत आणि आपल्या मनातील प्रेमापासून ते विखार- वासनेपर्यंत सगळ्याकडं तो नवजात कुतुहलानं पाहू शकत होता. प्रामाणिकपणे हे सारं नोंदवत होता आणि स्वतःचं शास्त्र, स्वतःची शस्त्रं घडवत होता. सर्वसामान्य माणसाकडं जे अंगभूत शहाणपण असतं आणि संस्कृती-परंपरेनं त्याला जे ज्ञान दिलेलं असतं, तेवढंच होतं मोहनदास करमचंद गांधी या माणसाकडं. पण, चारित्र्य आणि सत्याचा आग्रह, अपार करुणा आणि प्रेम यामुळं हा माणूस निर्भय झाला. मानवी मूल्यांवरील निष्ठेमुळे अखंड चालत राहिला. विचार आणि कृतीतील अद्वैतामुळे संग्रामाचा सेनानी झाला.

गांधी मजबूरी का नहीं, मजबूती का नाम है, एवढा तो बुलंद होत गेला. त्याला कोणापेक्षा मोठं व्हायचं नव्हतं. त्याला सतत मोठं व्हायचं होतं. उंच व्हायचं होतं. मातीत रुतलेले पाय आणि तरीही आकाशाकडे फैलावलेले हात, असा हा माणूस वाढत राहिला. या लहान चणीच्या माणसानं त्यातून असं विलक्षण तेज मिळवलं की नौआखालीत पेटलेल्या दंगलीत तो एकटा उतरला आणि अवतीभवतीच्या ज्वालांची पर्वा न करता निघाला. लॉर्ड माउंटबॅटननं तेव्हा गांधींना पत्र लिहिलं होतं. माउंटबॅटन म्हणतो, 'प्रिय गांधी, पंजाबात आमच्याकडं ५५ हजार सैनिक आहेत. आणि, तरीही दंगल आटोक्यात येत नाहीए. बंगालमध्ये आमच्या सैन्यात एकच माणूस आहे. आणि, तिथं मात्र दंगल पूर्णपणे शमलेली आहे. या 'वन मॅन बाउंड्री फोर्स'बद्दल मी कृतज्ञता व्यक्त करु शकतो का?'

'One Little Man of India' अशी ज्याची ओळख परदेशात करुन दिली जात असे, त्या चिमुकल्या माणसानं जग घडवलं. गांधी नावाचा माणूस असा पुन्हा पुन्हा भेटत राहतो. नव्या नव्या प्रदेशात, नव्या नव्या रुपात त्याचं पुनरुत्थान होत असतं. कधी तो मार्टिन ल्युथर किंगच्या रुपात भेटतो आणि सांगतो, 'आय हॅव अ ड्रिम'! कधी खान अब्दुल गफारखानच्या रुपानं 'सरहद गांधी' म्हणून भेटतो. कधी नेल्सन मंडेलांच्या वज्रमुठी उंचावत वर्णभेदाविरुध्द आरोळी ठोकतो. कधी गांधींचेच शब्द घेऊन उसने, आमचा ओबामा म्हणतो, Be the change, you believe in... Yes, we can!

गांधी इथं तिथं नसतोच मुळी. सरकारी भिंतीवर तो दिसला तरी, त्याचा पत्ता आपल्या अंतःकरणात असतो. आणि म्हणूनच, कलेक्टर कचेरीत चिरिमिरी मागणाऱ्या कारकुनाला सुनावणाऱ्याला तुमच्या माझ्यासारख्या सामान्य माणसातही गांधी असतोच! न घाबरता सत्तेला प्रश्न विचारणाऱ्या प्रत्येकामध्ये तो असतो. कधी कधी आपण त्याला टाळतो, त्याची भेट नाकारतो, चुकीच्या वाटेने चालू लागतो, तेव्हा तो आपली वाट रोखून उभा राहतो आणि मिस्किल हसत विचारतो, 'काय, इकडं कुठं?'' 'लगे रहो मुन्नाभाई'तल्या बापूसारखं तो हे विचारतो आणि आपण अंतर्बाहय चटपटतो.

गांधी आडवा येतो, आजही. गांधींवर हल्ला करणं ते थांबवत नाहीत आणि गांधी काही मरत नाही!

*- संजय आवटे*

# “कुंभमेळ्यातील शोकांतिका: धार्मिक बाजारपेठ, सरकारी हस्तक्षेप आणि मौन धरणारे विरोधक”

**कुंभमेळ्यात १५०० लोक बेपत्ता असल्याची अधिकृत नोंदणी झाली. बेपत्ता असलेल्या ज्या लोकांचे आधार कार्ड, वोटिंग कार्ड किंवा इतर सरकारी ओळख पत्र, त्यांचे नातेवाईक देऊ शकले फक्त त्यांचीच नोंद, बेपत्ता म्हणुन करण्यात आली. बाकी जे इतर बेपत्ता झालेले लोक आहेत ज्यांचे कुठलेच ओळख पत्र त्यांच्या नातेवाईकांकडे नाही आहेत, अशा लोकांची नोंद स्वीकारण्यात आली नाही आणि त्यांची संख्या सुद्धा हजाराच्या घरात असल्याचे समजते. ह्यावरून अंदाज केला जाऊ शकतो की ज्या ६ ठिकाणी एकाच रात्री भगदड आणि चेंगराचेंगरी झाली, त्यामध्ये किती लोकांचा मृत्यू झाला असावा.**

कुंभमेळ्यात हा जो मृत्यूचा तांडव घडला ह्याच्याकडे पाहण्याचे दोन दृष्टिकोन आहेत. पहिला म्हणजे सरकारी, आरएसएस/बीजेपीवाल्यांचा आणि त्यांचे गुलाम असलेल्या मनुवादी मीडिया चा दृष्टिकोन. ह्या दृष्टिकोनातून पाहिले तर कुंभमेळ्यात कोणतीच सरकारने दखल घ्यावी अशी मृत्यूहानी झाली नाही. जे काही सरकार आणि त्यांच्या गुलाम मीडियाने अधिकृत जाहीर केल्याप्रमाणे ३०-४० लोक मृत्यू झाले, ती त्यांच्यासाठी चिंता करण्यासारखी गोष्ट नाही. अशा छोट्या मोठ्या गोष्टी होतच असतात. त्याही पुढे जाऊन तो धिरेंद्र शास्त्री नावाचा बदमाश म्हणतो की, गंगेच्या तीरावर मृत्यु होणे म्हणजे मोक्ष मिळणे आहे. त्यामुळे ते मृत्यू झालेले लोक भाग्यवान आहेत.

दुसरा दृष्टिकोन असलेले लोक कुंभमेळ्यात असलेल्या अव्यवस्थेवर टीका करणाऱ्यांचा आहे. ते तिथे झालेल्या चेंगराचेंगरी साठी सरकारला जबाबदार धरून त्यावर टीका करत आहे. हेच मीडियाचे खरे काम आहे. ह्यामध्ये मुख्यतः यु ट्यूबर्स आहेत – अशोक वानखेडे, रवीश पांडे, चीत्रांशी,



अजित अंजुम, अभिसार शर्मा, साक्षी जोशी, प्रज्ञा मिश्रा, वैगरे. हे सगळे आणि आणखी काही पत्रकार हे आधीचे गोदी मीडियात काम केलेले, पण आता तेथून बाहेर केलेले पत्रकार आहेत. हे सध्याच्या गोदी मीडियातील भ्रष्ट पत्रकारांपेक्षा खूप प्रामाणिक reporting करत आहेत. ते सरकारला कठघऱ्यात उभे करून, सरकारी यंत्रणेला कुंभमेळ्यातील मृत्यू साठी दोषी धरत आहेत.

परंतु, ह्या दोन्ही दृष्टिकोनाच्या व्यतिरिक्त एक महत्त्वाचा दृष्टिकोन आहे, ह्याबाबतीत कोणीच बोलत नाही, दुसऱ्या दृष्टिकोनातील यूट्यूबर पत्रकार पण नाही. तो दृष्टिकोन म्हणजे –

***१. सर्वप्रथम कुंभमेळा भरवणे हे सरकारचे काम आहे काय? आतापर्यंत कुंभमेळ्याचे आयोजन वेगवेगळ्या संतांच्या आखाड्याद्वारे केले जात होते. ते आता उत्तर प्रदेश सरकार का करत आहे?***

***२. भारतीय राज्य घटने नुसार, सरकारचा धर्म नसतो. सरकार हे धर्मनिरपेक्ष असायला पाहिजे. मग इथे खुल्लम खुल्ला सरकार धार्मिक मेळ्याचे आयोजन कसे करत आहे, ते ही सरकारी तिजोरीतून १० हजार रुपये खर्चून?***

***३. तिसरा आणि सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, सरकार जाहीरपणे लोकांना कुंभात येऊन स्नान करण्याचे आव्हान करत आहे. त्यासाठी करोडो रुपयांची जाहिरात केली जात आहे. खरंच नदीत स्नान करून लोकांचे पाप धुतले जाऊ शकतात काय? मग कर्मसिद्धांताचे काय? तुम्ही पाप केले तर तुम्हाला शिक्षा मिळणारच हे कर्मसिद्धांत सांगतो. तेव्हा हा गंगेत स्नान करून पापक्षालन होते ही धारणा च मुळात धर्मविरोधी आहे. ह्याच चुकीच्या धारनेमुळे, लाखो गरीब, कष्टकरी, वंचित, अशिक्षित, अज्ञानी, अंधश्रद्धाळू, भोळे भाबडे लोक कुंभमेळ्यात येतात आणि आपल्या अमूल्य प्राणाची किंमत मोजून देतात. ह्या धर्माच्या बाजारावर, हे ब्राम्हण यूट्यूब पत्रकार पण प्रश्न उचलत नाहीत.***

***४. काँग्रेस, समाजवादी पार्टीसारखे विरोधी पक्ष आणि त्यांचे नेते सुद्धा ह्या धर्माच्या नावावर चाललेल्या बाजारावर प्रश्न विचारत नाही. त्याउलट तो अखिलेश यादव स्वतःच तिथे डुबकी मारायला गेला होता. त्यामुळे मरणाऱ्या लोकात सर्वाधिक यादव आणि तत्सम ओबीसी लोकांची संख्या सर्वाधिक असेल ह्याची खात्री आहे. हे विरोधी पक्ष सुद्धा उत्तर प्रदेश सरकार कुंभमेळ्याचे आयोजन कसे करू शकतो ह्यावर प्रश्न उठवत नाही.***

त्यामुळे आज देशात जो धर्माचा बाजार चालला आहे त्यासाठी केवळ बीजेपी/आरएसएस आणि त्यांच्या सरकारांना जबाबदार धरने पुरेसे नाही. ह्यामध्ये विरोधी पक्ष, सामाजिक संघटना, बुद्धिजीवी वर्गातील लोक आणि हे स्वतःला धर्मनिरपेक्ष समजणारे ब्राम्हण यूट्यूबर सुद्धा तेवढेच जबाबदार आहेत. ह्या यूट्यूबर मध्ये अपवाद आहेत ते ओबीसी समाजाचे काही जागृत युट्यूब संपादक आणि पत्रकार जसे नवीन कुमार आणि शंभु कुमार जे प्रश्न उपस्थित करायला पाहिजेत ते करत आहेत.

*(समाजमाध्यमातून साभार...)*

# लोकसत्तेतील ‘आहे बहुमत म्हणून...?’ या अग्रलेखातून...

**सोनिया गांधी यांच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या भाषणावरील प्रतिक्रियेविषयी. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाचे कौतुकच करायला हवे असा काही नियम आहे काय? असेल तर तो कधी अस्तित्वात आला? मग काँग्रेसकालीन राष्ट्रपतींवर भाजप नेते इतकी वर्षे टीका करत आले आहेत त्याचे काय? आणि मुख्य म्हणजे भाजपच्या होयबांचा संताप व्हावा असे सोनिया गांधी म्हणाल्या तरी काय? द्रौपदीबाईंचे भाषण नुसते कंटाळवाणे नव्हते, तर ते कमालीचे कंटाळवाणे होते. ते तसेच असणे अपेक्षित होते. मुळात राष्ट्रपतींचे भाषण हे राष्ट्रपतींचे नसते. ते मंत्रिमंडळाने मंजूर केलेले असते.** राष्ट्रपती फक्त त्याचे वाचन करतात. हे भाषण म्हणजे सरकारी योजनांची जंत्री होती. यातही काही नवीन नाही. त्यात द्रौपदीबाई फर्ड्या वक्त्या नाहीत. अर्थात त्या जरा जरी तशा असत्या तर या पदावर विराजमान होत्या ना. व्यक्ती जितकी सपाट आणि सुमार; तितकी तिच्या उच्चपदी नियुक्तीची शक्यता अधिक हे सद्याकालीन सत्य. पण सोनिया गांधी यातील काहीही म्हणाल्या नाहीत. ‘‘बिच्चाऱ्या’’ (पुअर थिंग) हे सोनिया गांधी यांनी या भाषणाविषयी वापरलेले विश्लेषण. ‘‘बोलून बोलून दमल्या’’ (गॉट टायर्ड ऑफ स्पीकिंग) हे त्यांनी केलेले भाषणाचे वर्णन. यात ‘‘आदिवासी महिलेचा अपमान’’ वगैरे कसा काय होतो? स्त्रीदाक्षिण्य, सभ्यता यांचा येथे आदर होतो असे म्हणावे तर ‘‘जर्सी गाय’’ वगैरे उल्लेखांचे काय? आता या भाषणाविषयी सोनिया गांधी यांच्यावरही कारवाईची मागणी केली जात आहे. एकंदर परिस्थिती लक्षात घेता अध्यासनांकडून ती पूर्ण होईलही. पण राष्ट्रपतींवर टीका करण्यास मनाई आहे काय, हा प्रश्न तसाच राहील.

सद्य:स्थितीत परीक्षेस जाणाऱ्या नातवंडाच्या हाती दही-साखर ठेवण्याची ‘जबाबदारी’ असलेल्या घरगुती आजीशी राष्ट्रपतींची तुलना होऊ शकेल. तथापि घरची आजी दही-साखर हाती फक्त ठेवते. राष्ट्रपती महोदयांवर ते भरवण्याची वेळ येते. एरवी राष्ट्रपतीपदाची ‘गरिमा’ वगैरेविषयी कंठरवात वचावचा करणाऱ्यांस मंत्र्यासंत्र्यांस दही-साखर भरवणे हे राष्ट्रपतींचे काम आहे काय, हा प्रश्न पडू नये? तेव्हा यातही सोनिया गांधी यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी करण्यासारखे काही नाही. उलट अशी मागणी करणे, राहुल-सोनिया यांच्याविरोधात देशभरात खटले दाखल होतील हे पाहणे वगैरे हास्यास्पद कृत्यांमुळे सत्ताधाऱ्यांस या मायलेकांची भीती वाटते की काय, असा प्रश्न पडतो.

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**